
राष्ट्रीय शिक्षण संस्थेचे नॅक पुनर्मूल्यांकित

# स्वामी विवेकानंद कला व वाणिज्य रात्र महाविद्यालय

डोंबिवली




# सायंतारा

# एक दिवसीय चर्चासत्र





















# सायंतारा

Rashtriya Shikshan Sanstha's
NAAC Re-Accredited

**Swami Vivekanand Night College of Arts & Commerce**

Dombivli

**2019-2020**
**Issue No. 17**

## ❖CONTENTS❖


1) संपादकीय ... १
2) From Principal's Desk ... २
3) मराठी विभाग ... ४
4) Personal Achievements ... १९
5) Reports ... २०


EDITOR
**Dr. Shrinivas M. Athalye**

Photographer
**Rakesh Godbole**

Printer
**Swati Mudran, Dombivli.**

The opinions expressed in this Magazine are of the contributors' themselves and the Editor and Editorial Committee do not necessarily agree with them.

Only for private circulation.

# संपादकीय ......

विद्यार्थी मित्र-मैत्रिणींनो,

सध्याचा काळ खूप कठीण आहे हे सर्वजण जाणतातच. वैश्विक महामारीने सर्वसामान्यांच्या आयुष्यात 'न भूतो न भविष्यति !' अशी ढवळाढवळ करून टाकली आहे. जगाच्या कुठल्या तरी कोपऱ्यात जन्मलेला कोरोनाचा हा विषाणू आपल्या घराच्या सांदी-कोपऱ्यात वसतीला येऊन राहिला आहे आणि त्याच्या दहशतीच्या छायेत आपण वावरत आहोत.

सुरूवातीला या विषाणूचा काहीच अंदाज येत नव्हता. तर्क, कल्पना आणि अफवा यांना ऊत आला होता. सोशल मिडिया तर याचा मोठा पुरवठादार होता. पण सामाजिक संस्था, शासकीय यंत्रणा यांच्या माध्यमातून जनजागृती होत गेली. आता तर त्यावरची लससुद्धा उपलब्ध झाली आहे. त्यामुळे लवकरच जनजीवन पूर्वपदावर येईल अशी आशा वाटू लागली आहे.

पण विद्यार्थी मित्र-मैत्रिणींनो, तुमची मात्र यंदा मजाच झाली. न मागता भरपूर सुट्टी मिळाली. कॉलेज नाही, लेक्चर नाही, ऑनलाईन परीक्षा आणि रिझल्टचा बंपर धमाका! एकूणच काय, तर टेन्शन नाही.

पण इच्छा तिथे मार्ग असतो मंडळी. ऑफ लाईन वर्ग बंद झाले तसे ऑनलाईनचे वारे वाहू लागले. क्लास ऑनलाईन, लेक्चर ऑनलाईन, परीक्षा ऑनलाईन. हा नवीन प्रकार सुरुवातीला अवघड गेला. पण त्यातही एक वेगळीच मजा होती.

या काळात आपण बऱ्याच गोष्टी शिकलो. आपली कामे आपण करणे, कुटुंबाला वेळ देणे, घरगुती व सात्विक आहार घेणे, कला जोपासणे. तुम्हीसुद्धा यू-ट्यूबवर विविध शैक्षणिक व्हिडीओ पाहिले असतील. इंटरनेटवर माहिती सर्च केली असेल. कित्येकांचे वर्क फ्रॉम होम सुरू असेल. या काळात आपण हे शिकलो की संकटाला संधी मानली पाहिजे! आपण पाहतो की याच काळात किती तरी नवे नवे स्टार्ट अप बिझनेस उभे राहिले आहेत. अनेकांच्या नोकऱ्या गेल्या तर त्यांनी स्वतंत्र व्यवसाय सुरू केले. ज्याची कधी कल्पनाही केली नव्हती असे नवे नवे व्यवसाय उदयास आले. यालाच तर न्यू-नॉर्मल म्हणतात.

माणसाने नेहमी सकारात्मक रहावं. जगण्याची तीच तर खरी प्रेरणा आहे. लवकरच या न्यू-नॉर्मलमधून सबकुछ नॉर्मलकडे आपण जाऊ अशी आशा करू या.

धन्यवाद!

**- डॉ. श्रीनिवास आठल्ये**

# From Principal's Desk

Dear Readers,

At the outset itself I want to congratulate and compliment all the graduating students for receiving their degrees during the academic year 2019-20 from Mumbai University. Special congratulations to the award winners in the different subjects. Wish you all great success in your careers.

I have the proud privilege to present this brief report of the activities and achievements in the college for the academic year 2019 -20. It's the time to make an account of the happenings and events in the college.

By admitting 782 students in the college at F.Y., S.Y., and T.Y. B.A. and B.Com. classes where more than 90 % are employed ones, the college is making efforts to reach towards excellence with the motto in mind 'राष्ट्रहिताय ज्ञानसंवर्धनम् ।'

Thus, the college is serving fully its basic aim of providing education to deprived and deserving employed youth. This year, we have in total 70 students who have secured O grade, 34 students in A+ grade, 11 in grade A, 7 in grade B+ 11 students in B grade and 17 students in C, D and E grade from University examination of B.Com and 39 students who have secured O grade, 05 students in A+ grade, 02 in grade A, 1 in grade B+, 02 students in B grade and 06 students in D and E grade 05 from University examination of B.A. examination.

Besides academic curricula, we are focusing our attention on all round development of the students with the intention to make them versatile. The activities like N.S.S., Economics Club, Planning Forum, Commerce Association, Arts Association, Cultural Association, Women Development Cell, and Staff Academy are in full swing. The college in association with University of Mumbai has organized one day Seminar on **CBCS "Implementation of CBCS As Per UGC guidelines for under graduate programmes"** on 30th July 2019 where Hon'ble Dr. Ajay Deshmukh, Hon'ble Registrar of University of Mumbai was present to deliver Key Note address. The annual magazine of the college "Sayantara" was released on 30th July, 2019 at the hands Hon'ble Shri Deepakji Mukadam, Chnellors's Nominee of Management Council of University of Mumbai. The annual sports of the college were conducted during the first week of December 2019 followed by the celebration of various days and cultural programmes in the week called Tarangan. The Annual Prize Distribution Ceremony for felicitating students for excellence in Sports and extra curricular activities was held on 21st December 2019 where Principal Dr. Kailash Anekar Member of Board of Studies in Commerce of University of Mumbai was present to felicitate the students.

I will take this opportunity to express my sincere thanks to Office Bearers and Authorities of Rashtriya Shikshan Sanstha for their constant support and encouragement, and Teaching and Non Teaching members of staff. My students, members of student's council and volunteers of N.S.S. were of great help during the entire year. They are my strengths. My best compliments to all of the them.

विद्यार्थी मित्र-मैत्रिणींनो,

टाळेबंदीच्या काळात वाचनात आलेली एक गोष्ट मला प्रस्तुत करायला आवडेल. एका पराक्रमी मुलीची गोष्ट. तिचे नाव रीहा बुलोज ! वय फक्त ११ वर्षे, फिलीपाईन्स देशाची रहिवासी. ही मुलगी गेली दोन वर्षे तिच्या वडिलांकडे सतत

धावण्याचे बूट आणण्यासाठी भुणभुण करीत होती. परंतु तिच्या वडिलांना ही तिची मागणी आर्थिक कारणांमुळे पूर्ण करणे शक्यच नव्हते. परवडत नाही असे म्हणता म्हणता देशस्तरावर शालेय स्पर्धा जवळ आली. ही मुलगी अंतिम फेरीपर्यंत पोचली. सर्व इतर स्पर्धक मोठ्या मोठ्या ब्रँडच्या हायफाय बूटांच्या पेहरावामध्ये, हिच्याकडे बूटच नव्हते. मग जखमेवर लावायच्या पट्ट्या रीहाने बुटासारख्या पायावर लावल्या. त्यावर पेनाने लिहिले NIKE आणि जीव तोडून पळाली. ८०० मीटर, ९०० मीटर व १५०० मीटर तीनही शर्यंतीची सुवर्ण पदके या पठ्ठीने पटकावली. तिचे पेनाने लिहिलेले पट्टी शूज प्रसिद्ध झाले व NIKE कंपनीने पण रीहाच्या असामान्य कर्तृत्वाची दखल घेतली आणि चक्क तिचा पूर्ण खर्च कायमस्वरूपी करण्याची तयारी दर्शविली. पराक्रम डोक्यात असावा लागतो, बूटांमध्ये नाही. अभ्यास डोक्यात भिजलेला असावा लागतो, पुस्तकात नाही. आपण प्रथम मनात ठरवावे लागते. मला हे निभावयाचे आहे !

नाही तर हजारो रुपयांचे बूट आणले की सराव सुरू करण्याचा निश्चय करणारे, लाखो रुपयांचे क्लासेस लावले की मग अभ्यास सुरू करणार असे निश्चय करणारे व असेच इतर अनेक नुसत्याच पोकळ निश्चयाचे महामेरू गल्लोगल्ली खचून पडलेले आहेत. तुम्हीच ठरवा, तुमचा मार्ग !

रीहा तुझ्या कर्तृत्वाला सलाम !

**डॉ. अनुजा पळसुलेदेसाई**

## मुखपृष्ठाविषयी थोडेसे

कोरोनाची दाट छाया अद्याप जरी समाजमनावर दाट असली तरी सामाजिक व्यवहार पूर्वपदावर येत आहेत. यालाच ‘न्यू नॉर्मल’ अशी संज्ञा दिली आहे. सुरक्षिततेचे सर्व नियम पाळून आगामी काळात वाटचाल करावी लागणार आहे. मग ते वारंवार हात धुणे असेल, सॅनिटायझर वापरणे असेल किंवा सोशल डिस्टन्सिंग पाळणे असेल. याचीच चित्ररूप माहिती यावेळच्या सायंतारा या जोड-अंकाच्या मुखपृष्टासाठी निवडण्यात आली आहे.

**- डॉ. श्रीनिवास आठल्ये**
संपादक

# विनोबांचा भूदान यज्ञ

**अस्मिता हनवटे**
एफ.वाय.बी.कॉम

विनोबा भावेंचा जन्म ११ सप्टेंबर १८९५ रोजी गणेश चतुर्थीच्या दिवशी गागोदे, जिल्हा रायगड येथे झाला. धर्मपरायणतेचे संस्कार त्यांनी त्यांचे आजोबा शंभूराव भावे व त्यांच्या आई रखुमाबाई ह्यांच्याकडून घेतले.

त्यांचे वडील नरहरी भावे नोकरीनिमित्त बडोदे येथे गेल्याने विनोबा भावेंचे माध्यमिक व उच्च शिक्षण बडोदे येथेच झाले. ते अत्यंत विद्वान होते. आचार्य विनोबा भावे म्हणजेच विनायक नरहरी भावे हे सामाजिक संत म्हणून ओळखले जातात. ते भारतीय स्वातंत्र्यसैनिक तर होतेच; शिवाय ते भूदान चळवळीचे प्रणेते होते. हरिजनांच्या ४० कुटुंबांना मिळून फक्त पोटापुरती ८० एकर जमीन हवी होती. ह्या मागणीसाठी सरकारपर्यंत जाण्याची विनोबा भावेंची इच्छा नव्हती. म्हणूनच त्यांनी गावातल्याच श्रीमंत लोकांकडे हरिजनांसाठी थोडी जमीन देण्याची विनंती केली. तेव्हा रामचंद्र रेड्डी यांनी विनोबा भावेंचे आवाहन ऐकून लगेच आपली ९०० एकर जमीन देण्याची इच्छा वर्तवली. याच घटनेनंतर विनोबा भावेंच्या मनात भूदान चळवळींचा विचार आला.

ही चळवळ करताना त्यांनी पदयात्रा करून मोठमोठ्या श्रीमंत शेतकऱ्यांना जमीन मागणे सुरू केले. ते म्हणत असत की, ''हवा आणि पाणी ह्याचप्रमाणे जमिनीवरसुद्धा सर्वांना हक्क आहे. मला तुमचा एक मुलगा मानून तुमच्या जमिनीचा सहावा भाग द्या. या जमिनीवर भूमिहीन लोक राहून शेती करून आपला चरितार्थ चालवू शकतील.'' विनोबा भावेंच्या ह्या आवाहनाला जनतेने खूप चांगला प्रतिसाद दिला. लोकांनी सहज आपल्या जमिनीचा काही भाग विनोबा भावेंच्या भूदान चळवळीत दान केला. पदयात्रा करत विनोबा भावे पवनारला पोचले. तेव्हा हजारो एकर जमीन लोकांनी दान केली होती. ह्यामुळे विनोबा भावे आनंदित झाले व त्यांनी उत्तर भारताची यात्रा केली.

सरकारनेसुद्धा विनोबा भावेंच्या ह्या आंदोलनाला पाठिंबा दिला. उत्तर प्रदेश व बिहारमध्ये मोठ्या प्रमाणावर लोकांनी भूदान केले. मिळालेली जमीन सर्वांना सारख्या प्रमाणात विभागून देता यावी म्हणून सरकारने भूदान ॲक्ट पास केला. भूदान चळवळ यशस्वी झाल्यानंतर विनोबा भावेंच्या मनात ग्रामदान चळवळीची कल्पना आली. ह्या चळवळीत ७५ टक्के शेतकरी आपल्या जमिनी एकत्र करून नंतर त्याचे समान हिस्से करून वाटून घेत असत. काळाच्या ओघात ह्या दोन्ही चळवळी थंडावल्या. परंतु ह्या चळवळीदरम्यान मोठी लँड बँक तयार झाली.

केंद्र सरकारच्या आकडेवारीनुसार संपूर्ण देशात जवळजवळ २२.९० लाख एकर जमीन दान करण्यात आली. भूदान चळवळीत टीका करणारे असे सांगतात की, ह्या चळवळीत विनम्रपणे जी जमीन मागितली होती, तिचे स्वागत सरकारने उत्साहाने केले कारण त्यांना मोठ्या शेतकऱ्यांवर कायद्याने सिलिंग करायचे नव्हते. अनेकांनी जमीन दान करूनसुद्धा त्यावर स्वतःच शेती करणे सुरू ठेवले. काहींनी नापिक जमीन दान केली जी काहीच कामाची नव्हती.

जमिनीचे वाटप सुद्धा योग्य प्रकारे समान झाले. वर सांगितलेल्या २२.९० लाख एकरातील ६.२७ लाख एकर जमिनीचे अजूनही गरजवंतांना वाटप झालेले नाही.

विनोबा भावेंची कर्मभूमी असलेल्या एकट्या महाराष्ट्रातच ७७ हजार एकर जमीन तशीच वाटपाविना नुसतीच पडून आहे. भूदान चळवळीमुळे विनोबा भावेंना प्रसिद्धी मिळाल्यामुळे सरकार व विद्यार्थी आंदोलक या दोघांनाही विनोबा आपल्या बाजूने हवे होते.

आयुष्यभर लोकांसाठी झटण्याचे व्रत घेतलेल्या विनोबा भावेंनी हरिजनांना त्यांचा हक्क मिळावा म्हणून मोलाचे कार्य केले. त्यांचे दुःख कळण्यासाठी स्वतः मैला डोक्यावर वाहून नेला. येणाऱ्या पिढीला मार्गदर्शन होईल म्हणून आश्रम काढले, पुस्तके लिहिली. आजही त्यांचे विचार व त्यांचे संपूर्ण आयुष्य सर्वांसाठी मार्गदर्शक आहे.

■■■

# आचार्य विनोबा भावे

**चांदणी प्रकाश आमोदकर**
एस.वाय.बी.ए

विनायक नरहरी भावे (आचार्य विनोबा भावे) नावाने प्रसिद्ध (सप्टेंबर ११, इ.स. १८९५ - नोव्हेंबर १५, इ.स. १९८२) हे भारतीय स्वातंत्र्य सैनिक व भूदान चळवळीचे प्रणेते होते. महात्मा गांधींनी १९४० मध्ये वैयक्तिक सत्याग्रह पुकारला, त्यावेळी पहिले सत्याग्रही म्हणून त्यांनी आचार्य विनोबा भावे यांची निवड केली. ब्रिटिश राज्याविरोधी या आंदोलनाचे पर्यावसान १९४२ मध्ये 'छोडो भारत' आंदोलनात झाले. भावे पुढे सर्वोदयी नेते म्हणून प्रसिद्ध झाले.

टोपण नाव - विनोबा

जन्म - ११ सप्टेंबर १८९५ गागोदे, जि. रायगड

मृत्यू - १५ नोव्हेंबर १९८२ (लक्ष्मी पूजन - दिवाळी) पवनार, महाराष्ट्र, भारत

चळवळ - भारतीय स्वातंत्र्यलढा, भूदान चळवळ.

पुरस्कार - भारत रत्न पुरस्कार (१९८३)

धर्म - हिंदू

प्रभाव - महात्मा गांधी

वडील - नरहर शंभूराव भावे

आई - रखुमाबाई नरहर भावे

कोकणातील रायगड जिल्ह्यातील पेण तहसिलातील गागोदे या गावी विनोबा तथा विनायक नरहर भावे यांचा जन्म झाला. आजोबांचे नाव शंभूराव भावे. शंभूराव भावे यांचे जन्मगाव वाई. त्यांच्या अनेक पिढ्यांचे वास्तव्य वाई येथे होते. वाईच्या ब्राह्मणशाही या मोहल्ल्यात कोटेश्वर मंदिर आहे. हे भावे यांच्या मालकीचे असून तेथे शंभूरावांनी अग्निहोत्र स्वीकारून अग्निहोत्र शाळा स्थापली होती. आजोबा आणि मातुश्रींपासून धर्म परायणतेचे संस्कार विनोबांना मिळाले. त्यांचे वडील नरहरी शंभूराव भावे व आई रखुमाबाई नोकरीच्या निमित्ताने बडोदे येथे गेले. विनोबांचे माध्यमिक आणि उच्च शिक्षण बडोदे येथेच झाले. १९१६ साली महाविद्यालयीन इंटरची परीक्षा देण्यासाठी ते मुंबईस जाण्यास निघाले. परंतु वाटेतच सुरतेस उतरून आई वडिलांना न कळविताना वाराणसी येथे रवाना झाले. त्यांना दोन गोष्टींचे आकर्षण होते. एक हिमालय व दुसरे बंगालचे सशस्त्र क्रांतिकारक. वाराणसी येथे हिंदू विश्वविद्यालय एका समारंभात महात्मा गांधीचे भाषण झाले. त्यांचा त्यांच्या मनावर खोल परिणाम झाला.

हिमालयातील अध्यात्म आणि बंगालमधील क्रांती यांच्या दोन्ही प्रेरणा महात्मा गांधीच्या उक्तीत आणि व्यक्तिमत्त्वात त्यांना आढळल्या. त्यांनी महात्मा गांधींशी पत्रव्यवहार केला व गांधींची कोचरब आश्रमात ७ जून १९१६ रोजी भेट घेतली आणि तेथेच त्या सत्याग्रहाश्रमात नैष्ठिक ब्रह्मचर्याची प्रतिज्ञा करून जीवनसाधना सुरू केली. ऑक्टोबर १९१६ रोजी महात्मा गांधींची एक वर्षांची रजा घेऊन ते वाई येथे प्रास पाठशाळेत वेदान्ताच्या अध्ययनाकरिता उपस्थित झाले. ब्रह्मविद्येची साधना त्यांच्या जीवनोदेश होता.

आचार्यांच्या निधनाची वार्ता भारतभर व जगभर सर्व प्रचारमाध्यमातून विद्युत वेगाने पसरली. या निधनाला कोणी महानिर्वाण म्हणाले, कोणी युगपुरुषाची समाधी म्हणाले.

महात्मा गांधींच्या आध्यात्मिक परंपरेचे ते एक श्रेष्ठ वारस होते. त्यांचे हे प्रायोपवेशनाचे तंत्र, हिंदू धर्म, बौद्ध व विशेषतः जैन धर्म या तिन्ही धर्मांना प्राचीन कालापासून मान्य असलेले तंत्र आहे. जैन धर्मात या तंत्रास 'सल्लेखना' अशी संस्कृत संज्ञा आणि 'संथारा' ही प्राकृत संज्ञा आहे. हिंदू धर्मात यास 'प्रायोपवेशन' म्हणतात. प्राय म्हणजे तप. तपाचा एक मुख्य अर्थ 'अनशन' असा आहे. देहाचे दुर्धर रोग बरे होऊ शकत नाहीत, असे निश्चित झाल्यावर रुग्णाला जल प्रवेशाने, अग्नी प्रवेशाने, भूपतनाने (उंच कड्यावरून उडी मारून)

अनशनाने (अन्न पाणी वर्ज्य करून) किंवा अन्य कोणत्याही इष्ट मार्गाने देह विसर्जन करण्याची हिंदू धर्मशास्त्राने अनुमती दिली आहे. ज्ञानदेवादी संतांनी योग मार्गाने देह त्याग केला आहे. हा योग मार्ग गुरूगम्यच आहे. त्याचे वर्णन गीतेच्या आठव्या अध्यायात केले आहे. तात्पर्य, प्रायोपवेशन किंवा योग शास्त्रातील देह त्यागाची रीती हिंदू धर्मशास्त्राने मान्य केली आहे. विनोबांनी प्रायोपवेशनाच्या द्वारे देह त्याग केला. अनेक जैन साधू आणि साध्वी स्त्रिया आजही प्रतिवर्षी अशा प्रकारे देह त्याग करीत असतात आणि त्याची वार्ता वृत्तपत्रांतही केव्हा केव्हा येते. स्वातंत्र्यवीर सावरकर, धर्मानंद कोसंबी यांनी अशाच प्रकारे देह त्याग केला आहे.

■■■

## गुरुपौर्णिमा स्तवन

गुरुचा पाठीवर हात जिथे ।
ज्ञानाची होई प्रभात तिथे ।।

गुरुचा साक्षात्कार जेथे जेथे ।
ज्ञानाची ज्योत तेवी तेथे तेथे ।।

गुरुचा वाणीतील प्रत्येक शब्द ।
ज्ञानी पंडितांसही करी निःशब्द ।।

गुरुचा व्यासंग अनुभवावा ।
ज्ञानाचा सुगंध पसरवावा ।।

गुरुचा दुर्लभ सहवास ।
ज्ञानाचा सुखद करी प्रवास ।।

गुरुचा विसर न व्हावा ।
हा देह गुरुचरणी विसावा ।।

गुरुचा महिमा वर्णावा ।
अखंड गुरुनाम जपावा ।।

इति श्री गुरुपौर्णिमा स्तोत्र सुफळ संपूर्ण ।।

**डॉ. माधुरी रामधरणे**
मराठी विभाग

## स्त्री महिमा

'आई' - आईच्या निखळ मायेच्या ओलाव्यात चिंब मी नाहले.

'मुलगी' - मुलगी म्हणून जगताना माझ्या लहान भावंडांना मी लाडे लाडे जोपासले.

'ताई' - ताई जरी मी झाली नसली तरी ताईपणाच्या सर्व जबाबदाऱ्या मी पार पाडल्या.

'मामी' - मामीकडून माझ्या मात्र आजोळचे सगळे हट्ट मी पुरवून घेतले.

'आजी' - आजीने तर माझ्या दुधावरच्या सायीसारखे मजला जपले.

'मावशी' - मावशी म्हणून न मिरवता हक्काने मी त्यांची 'आई'च बनून राहिली.

'बायको' - बायको म्हणून जगताना पतीचे निखळ प्रेम मी अनुभवले.

'सून' - सून म्हणून जगताना सासूबाईंच्या रूपातच माझी आई मी पाहिली.

'वहिनी' - वहिनी म्हणून जगताना कधीच दीर-नणंदेला ना दुखावले.

'आत्या' - आत्या म्हणून जगताना भाचवंडांचे सर्व लाड पुरविले.

'काकू' - काकूचा मान न घेता इथेही मी 'मोठी आई'च झाली.

'मैत्रीण' - मैत्रिणीचे नाते जपताना माझ्यातील 'स्त्री'चा उत्तरोत्तर विकास झाला.

'विद्यार्थिनी' - विद्यार्थिनीचे नाते जपताना मी सदैव नम्र राहिली.

**डॉ. माधुरी रामधरणे**
मराठी विभाग

# परिचय रिडर्स क्लबचा

**डॉ. श्रीनिवास आठल्ये**
ग्रंथपाल

अध्ययनाचा संबंध ज्ञानाशी आहे, ज्ञानाचा संबंध पुस्तकांशी आहे आणि ग्रंथालय हे तर पुस्तकांचे आगार आहे. बसगाड्यांचे पण आगार असते. पण आगारात बसगाड्या नुसत्या उभ्या ठेवून चालत नाहीत. त्यांची ये-जा व्हायला हवी. फेऱ्या झाल्या पाहिजेत. तरच प्रवाशांच्या सेवेसाठी हे त्यांचे ब्रीद वाक्य व्यवहारात उतरून सार्थकता मिळवू शकते.

पुस्तकांचेही तसेच आहे. वाचकांमध्ये त्यांची ये-जा व्हायला हवी. इथे वाचक म्हणजे महाविद्यालयातील विद्यार्थी होय. हा विद्यार्थी ग्रंथालयात यावा, त्याने पुस्तक पहावे, हाताळावे. वाचून त्यावर काही भाष्य करावे, असे सतत वाटत होते. त्यासाठी काय करायचे ? मळलेल्या वाटेचे पारंपरिक प्रकार नकोत. काही तरी वेगळे, नवे व आकर्षक अशा प्रकारचे हवे. तेव्हा काय करायचे? असा विचार करताना एक नवीन कल्पना सुचली आणि ती म्हणजे रिडर्स क्लब किंवा वाचन कट्टा.

हा एक नवीन क्लब होता. वाचनाची आवड असलेल्या विद्यार्थ्यांना एकत्र आणणे. विशिष्ट प्रकल्प हाती घेऊन तो पूर्ण करणे. पहिल्या सत्रात दोन व दुसऱ्या सत्रात एक असे कार्यक्रम करणे. यासाठी पुढील उद्दिष्टे डोळ्यापुढे ठेवली होती.

१) विद्यार्थ्यांचे ग्रंथालयातील येणे-जाणे वाढवणे.

२) वाचनाची गोडी लावणे.

३) माहिती शोधण्यातला व माहिती देण्यातला आनंद मिळवणे.

४) माहिती सादरीकरणाचा अनुभव घेणे.

ही नवी संकल्पना प्राचार्य डॉ. अनुजा पळसुलेदेसाई यांना सांगितली. त्यांना ती आवडली. नव्या नव्या संकल्पनांना त्यांचा नेहमीच पाठींबा असतो. त्यांनी ही संकल्पना नुसतीच उचलून धरली नाही, तर योग्य ते मार्गदर्शन व सहकार्यही केले.

मग प्रा. अमित जोशी (अर्थशास्त्र विभाग) व श्री. शशिकांत गाणार (कार्यालय अधिक्षक) हेही येऊन मिळाले. आम्ही पुस्तक उतारा वाचन, पुस्तक परिचय लेखन व अभिवाचन असे तीन प्रकल्प वर्षभरात राबवले.

या क्लबमध्ये प्रथम वर्ष व द्वितीय वर्ष मिळून पंधरा विद्यार्थी सदस्य झाले.

**१) पुस्तक उतारा वाचन :-** यात विद्यार्थ्यांनी स्वतःच एक पुस्तक निवडले. उतारा शोधला. तो कसा वाचायचा याचे मार्गदर्शन त्यांना देण्यात आले. याचा मुख्य फायदा असा झाला की वाचतानाचे उच्चारदोष त्यांच्या लक्षात आले. जाणीवपूर्वक त्यांनी ते सुधारले. उताऱ्यामुळे ते संबंध पुस्तक वाचण्याची त्यांना इच्छा झाली व ते त्यांनी वाचूनही काढले. उतारा वाचन उपस्थित विद्यार्थी व प्राध्यापक यांच्यासमोर झाल्याने त्यांचा उत्साह वाढला.

**२) पुस्तक परिचय लेखन :-** हा पुढला प्रकल्प होता. उतारा वाचनात फक्त उताऱ्या पुरता संबंध होता. पण पुस्तक परिचयासाठी संबंध पुस्तक वाचणे गरजेचे होते. विद्यार्थ्यांनी हौसेने हा प्रकल्प पूर्ण केला. त्यांना लिहायला सोपे जावे म्हणून काही मुद्दे दिले होते. त्या मुद्यांच्या आधारे केलेले परीक्षण नंतरच्या कार्यक्रमात त्यांनी उपस्थितांसमोर वाचून दाखवले. त्यातून खूप आत्मविश्वास आल्याचे त्यांनी बोलून दाखवले.

**३) संवाद अभिवाचन :-** तिसरा प्रकल्प होता संवाद अभिवाचन. नाटकातील एखादा प्रसंग घ्यायचा त्यातील पात्र निवडायचे व ते वाचिक अभिनयाद्वारे

सादर करायचे. असे या प्रकल्पाचे स्वरूप होते. त्यासाठी दोघादोघांच्या जोड्या केल्या होत्या. विद्यार्थ्यांनी बरीच पुस्तके पाहिली. त्यातून हवे ते नाटक निवडले. प्रवेश निश्चित केला. मोकळ्या वेळात तालीम केली व ठरलेल्या दिवशी उपस्थितांसमोर सादर केले. या निमित्ताने नाटक हा साहित्य प्रकार त्यांनी समजून घेतला. भूमिकेत शिरतानाचा आनंद घेतला. मजा केली.

रिडर्स क्लबचा समन्वयक म्हणून मला हे प्रकल्प राबवताना खूप आनंद झाला. यासाठी जी उद्दिष्टे ठरवली होती. ती पूर्णपणे साध्य करता आली. संख्या सुरूवातीला भलेही कमी असेल पण मार्ग योग्य होता, हे निश्चित. या क्लबचे वैशिष्ट्य म्हणजे निवेदन, अहवाल लेखन कार्यक्रमाचे नियोजनचा सर्व गोष्टी विद्यार्थ्यांनीच केल्या.

एकूणच रिडर्स क्लबचा पहिलावहिला अनुभव उत्साही व आनंदवर्धक होता. विद्यार्थ्यांशी केलेल्या चर्चेतून प्रकल्पासाठी निरनिराळे विषय पुढे आले. त्यांच्यातील सुप्त गुणांना प्रोत्साहन देऊन वाचनाची गोडी लावणे या कामाची आवड वाढली. पुढल्या वर्षासाठी ही शिदोरी पुरेशी आहे.

■■■

## 'आई', मला जन्म घेऊ दे !

मी जन्माला येण्याआधीच आई नको गं, माझा जीव घेऊ. मला मारून टाळताना तुला होणाऱ्या वेदना, दुःख नको गं तू देऊ. आई, तुझ्या स्वप्नांची पूर्तता करण्यासाठी तरी मला जन्म घेऊ दे. मी जर जन्माला आली नाही तर दादाला राखी कोण बांधणार ? मी जर जन्माला आली नाही तर तुला कन्यादानाचे सुख कोण देणार ? आई, मी इतकी का तुला जड झाली आहे?

आपल्या या एकत्र कुटुंबात मलाही जन्म घेऊ दे. आजी, आजोबा, काका, काकू, दादा, ताई यांनाही माझे लाड पुरवू दे. मी जन्माला येण्याआधी आई नको गं, माझा जीव घेऊ. आई! मलाही खूप खूप शिकून समाजात मानाने जगायचे आहे. आई मलाही माझी स्वतःची वेगळी ओळख तयार करून तुला कृतकृत्य करायचे आहे.

आई ! मी टाहो फोडून तुला विनंती करते, मी जन्माला येण्याआधी आई नको गं, माझा जीव घेऊ.

**डॉ. माधुरी रामधरणे**
मराठी विभाग

## साधना

'साधना' शब्दातच अर्थपूर्ण अर्थाची हमी
ज्ञानसाधना करणारा विद्यार्थी पूजितो सरस्वती माऊलीला
गाता गळा मानितो वीणाधारिणी शारदेला
नृत्यांगना नृत्यसाधनेत आकंठ पूजिते नटराजाला
भाविक आपल्या भक्तीच्या मळ्यात पूजितो कुलदैवताला
श्रमिक आपल्या श्रमदानात पूजितो कष्टकरी हातांना
शिल्पकार निराकार दगडास देऊन आकार साकारी शिल्प
चित्रकार रंगरेषांनी रेखाटी चित्रावली
साहित्यिक शब्दसुमनांनी गुंफितो साहित्यमाला
खरेच! 'साधना' शब्दाच्या अनेकानेक छटा दिसतात
कलाकार आपल्या खडतर साधनेतच साधी मनोकामना
साधनेच्या निरंतर प्रवासातच गाठी तो यशोशिखरांना
आपापल्या आवडत्या क्षेत्रात साधना करणाऱ्या प्रत्येक साधकाला
माझा त्रिवार सलाम ! माझा त्रिवार सलाम !

**डॉ. माधुरी रामधरणे**
मराठी विभाग

## महामारी

२०२० च्या इंग्रजी नववर्षाचे स्वागत साऱ्या जगाने आनंदाने केले
जाने-फेब्रु. महिन्यात सारे जग शांत, निवांत जीवन जगत होते
अन् मार्च महिन्यात मात्र कोरोनाची महामारी थैमान घालत
साऱ्या जगासमोर दत्त म्हणून उभी ठाकली
इथेच सारे जनजीवन विस्कळीत, हतबल झाले
'कोरोना' विषाणूने जगातील प्रत्येक माणसाचे जगणे अगतिक केले
कोरोना विषाणूच्या महाभयंकर पाशात काही अडकले,
काही गतप्राण झाले, तर काही सहीसलामत सुटले
कोरोना विषाणूने साऱ्या जगाला लक्ष्य केले
कोरोनाच्या या विषाणूने साऱ्या जगाला भक्ष्य केले
अर्थात प्रत्येक वाईट शक्तीचा अंतही वाईट होतो हे अटळ सत्य
हे ! 'कोरोना' महामारी, नको गर्वाने मिरवू जिथे तिथे
तुझीही घटका भरत आली आहे, आम्हीच तुझी जिरवू इथे आणि इथेच
।। तथास्तु ।।

**डॉ. माधुरी रामधरणे**
मराठी विभाग

# Implementation of CBCS as per UGC Guidelines for Undergraduate Programme

**डॉ. सूर्यकांत शेळके**
राज्यशास्त्र विभाग

दि. ३० जुलै २०१९ रोजी स्वामी विवेकानंद कला व वाणिज्य रात्र महाविद्यालय, डोंबिवली (पूर्व) आणि मुंबई विद्यापीठ, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने डॉ. हेडगेवार सभागृह, महाराणा प्रताप इमारत, डोंबिवली (प.) या ठिकाणी 'Implementation of CBCS as per UGC Guidelines for Undergraduate Programme' या विषयावर चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाला डॉ. अजय देशमुख (कुलसचिव, मुंबई विद्यापीठ, मुंबई), डॉ. दीपक मुकादम (विद्यापीठ व्यवस्थापन परिषद सदस्य), डॉ. सुभाष वाघमारे (अध्यक्ष, राष्ट्रीय शिक्षण संस्था) आणि प्राचार्या डॉ. अनुजा पळसुलेदेसाई (स्वामी विवेकानंद कला व वाणिज्य रात्र महाविद्यालय, डोंबिवली (पूर्व)) उपस्थित होते. राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सुरूवात झाल्यानंतर मान्यवरांच्या हस्ते सरस्वती व स्वामी विवेकानंदाच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले आणि त्यानंतर प्राचार्यांच्या हस्ते शाल, श्रीफळ व स्मृतिचिन्ह देऊन मान्यवरांचा सत्कार करण्यात आला.

प्रारंभी आपल्या प्रास्ताविकपर भाषणात कार्यक्रमाच्या आयोजनाचा हेतू स्पष्ट करताना प्राचार्या म्हणाल्या की, युजीसीने उच्च शिक्षणाच्या क्षेत्रात विद्यार्थ्यांमध्ये कार्यक्षमता व कौशल्यनिपुणता येण्यासाठी अनेक प्रयत्न केले. त्याचाच भाग म्हणून युजीसीने विद्यार्थ्यांना त्यांच्या आवडीनिवडीनुसार व उपयुक्ततेप्रमाणे शिक्षण मिळावे आणि आंतरविद्याशाखीय अभ्यासक्रमाच्या माध्यमातून त्यांचा व्यापक दृष्टिकोन बनावा; यासाठीची लवचीकता शिक्षणात येण्यासाठी सीबीसीएस हा उपक्रम हाती घेतला. तथापि, 'सीबीसीएस' ची रचना समजून घेणे व उच्च शिक्षणातील शिक्षक व विद्यार्थ्यांची मानसिकता व दृष्टिकोन त्यासाठी अनुकूल बनावा या अनुषंगाने त्यावर सांगोपांग चर्चा होणे आवश्यक आहे आणि म्हणूनच हा हेतू साध्य व्हावा यासाठी या चर्चासत्राचे आयोजन करण्यात आल्याचे त्यांनी स्पष्ट केले. यानंतर राष्ट्रीय शिक्षण संस्थेचे अध्यक्ष डॉ. सुभाष वाघमारे यांनी संस्थेच्या विविध उपक्रमशील विकासाचा आढावा मांडून 'सीबीसीएस' सारख्या उपक्रमावर चर्चासत्र आयोजनाचा मान संस्थेच्या महाविद्यालयाला मिळाल्याने समाधान व्यक्त केले. यावेळी विधी महाविद्यालय चालविण्याची संधी विद्यापीठाने संस्थेला द्यावी अशी मागणीही त्यांनी केली. त्यानंतर डॉ. दीपक मुकादम आपले मार्गदर्शनपर मनोगत व्यक्त करताना म्हणाले की, २०१५ पासून युजीसीने हा उपक्रम हाती घेतला. त्यात मुंबई विद्यापीठासारख्या आंतरराष्ट्रीय विद्यापीठानेही मागे राहू नये म्हणून 'सीबीसीएस' चा उपक्रम राबविण्याचा निर्णय घेतला आहे. विद्यार्थ्यांना आपल्या आवडीनिवडीनुसार शिक्षण घेता यावे आणि आंतरविद्याशाखीय अभ्यासक्रमाच्या माध्यमातून त्यांचा दृष्टिकोन व्यापक बनावा व जगाच्या स्पर्धेत ते कुठेही कमी पडू नये; हाच हेतू यामागे असल्याचे ते म्हणाले. केवळ परंपरागत शिक्षणाच्या पद्धतीने काहीही साध्य होणार नाही. जगाच्या स्पर्धेत उतरायचे असेल तर नाविन्य स्वीकारावेच लागते. मात्र कोणतेही नवीन उपक्रम राबविताना अडथळे आणि आव्हाने असतातच. प्रश्न आहे तो त्यावर मात करण्याचा. ही आव्हाने स्वीकारून अडथळ्यावर मात करता यावी; यासाठीच या चर्चासत्राचे आयोजन असून निश्चितच हे उद्दिष्ट आपण गाठू शकू अशी अपेक्षा त्यांनी यावेळी व्यक्त केली.

यानंतर डॉ. अजय देशमुख यांनी आपले विचार मांडले. ते म्हणाले की, मानवी संस्कृतीच्या उत्क्रांतीच्या संक्रमणकाळात जगात अनेक चढ-उतार आले. पण विकास आणि प्रगती त्याच राष्ट्राची होते जिथे नागरिक लायक असतात. शिक्षण चांगले हवे असेल तर शिक्षक चांगले हवे. शिक्षक चांगले असतील; तर विद्यार्थी चांगले घडतील आणि विद्यार्थी चांगले घडले; तर राष्ट्र समृद्ध बनते. ही प्रगती व विकासाची प्रक्रिया आहे. त्यामुळे केवळ धोरणे ठरवून

उपयोगाचे नाही; तर त्यासाठी त्याची अंमलबजावणी करणे महत्त्वाचे आहे. नव्या नवलाईचे स्वागत उत्साहाने होते. मात्र त्या उपक्रमाची अंमलबजावणी तेवढ्याच उत्साहाने होत नाही; अशी खंतही त्यांनी व्यक्त केली. मुंबई विद्यापीठ हे आंतरराष्ट्रीय विद्यापीठ आहे. त्याची ही प्रतिमा कायम राखायची की ती ओळख पुसायची? हा खरा प्रश्न आहे. 'सीबीसीएस' ही अतिशय सरळ आणि सुस्पष्ट पद्धती आहे. परंतु त्याविषयी अगोदरच संभ्रम निर्माण केला जातो. माणसाला जीवनाचे विविध अंतरंग अनुभवायचे असतील तर त्यासाठी 'सीबीसीएस' आवश्यक आहे. त्याविषयी भीती बाळगून चालणार नाही. त्यासाठी शिक्षकांची भूमिका अतिशय महत्त्वपूर्ण असणार आहे आणि हाच त्याच्या यशाचा मार्ग आहे. जग झपाट्याने बदलत आहे आणि बदलत्या जगाच्या स्पर्धेत टिकवायचे असेल; तर आपल्यालाही बदल स्वीकारावेच लागतील. अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. देशमुख पुढे म्हणाले की विद्यापीठ हे महाविद्यालयांसाठीच आहे. महाविद्यालये आहेत म्हणून तर विद्यापीठ आहे. सर्व शैक्षणिक संस्था या सक्षमपणे विद्यार्थ्यांच्या प्रत्येक कसोटीला उतरतात की नाही? हे पाहण्याची गरज आहे. शिक्षक कसे आहेत? यावर शिक्षण व्यवस्थेची गुणवत्ता अवलंबून आहे. शिक्षणाचा विकास हा 'गुरूकुल ते कुलगुरू' या पद्धतीने साधायचा आहे. शैक्षणिक विकास साधण्यासाठी महाविद्यालयाच्या माध्यमातून विद्यापीठाचा आणि विद्यापीठाच्या माध्यमातून समाजाचा विकास होईल. त्याची सुरवात या कार्यशाळेतून झाली आहे. उच्च शिक्षणाचा दिवा कसा प्रज्वलित राहील आणि त्यातून राष्ट्र दैदिप्यमान कसे होईल? हे आपण पाहण्याची आवश्यकता आहे असेही त्यांनी सांगितले. प्रारंभी डॉ. सुमंत औताडे यांनी सर्व पाहुण्यांचा विस्तृत असा परिचय करून दिला.

यावेळी मान्यवर पाहुण्यांच्या हस्ते महाविद्यालयाच्या 'सायंतारा' या विशेषांकाचे प्रकाशनही करण्यात आले. सत्राच्या शेवटी डॉ. विजय मोरे यांनी मान्यवर पाहुण्यांचे व उपस्थितांचे आभार मानल्यानंतर सत्राची सांगता झाली.

Technical Session - I

Technical Session - I यामध्ये ''Cross Faculty Provision for Choice of Course to Students Higher Education : Benefits and Challenges'' या विषयावर चर्चा करण्यात आली. या पहिल्या सत्रात १) डॉ. रश्मी ओझा, २) प्राचार्य डॉ. शामकांत एच. अत्रे, ३) आलोक तिवारी, ४) मिहीर देसाई इ. नी सहभाग घेतला. प्रारंभी डॉ. सुमंत औताडे यांनी सर्व पाहुण्यांचा परिचय करून दिला. उपस्थितांना मार्गदर्शन करताना डॉ. ओझा म्हणाल्या की, 'सीबीसीएस' च्या माध्यमातून वेगवेगळ्या प्रवाहांना जोडणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांच्या डोक्यावर अनावश्यक ओझे लादण्याऐवजी त्यांच्या आवडीनुसार व आवश्यकतेनुसार शिक्षणाची संधी मिळाली; तर वेळ, पैसा आणि श्रम विनाकारण खर्च होणार नाही व वायाही जाणार नाही. आज जगातील बहुतांश विकासित देशात 'सीबीसीएस' च्या धर्तीवर शिक्षणाचे मॉडेल अवलंबण्यात आले आहे. अशा वेळी अध्यात्म आणि विज्ञान; कायदा आणि तर्कशास्त्र यात समन्वय आहे का? असा प्रश्न उपस्थित केल्यास त्याचे उत्तर होय असेच द्यावे लागेल. उदा. कायदा हा सर्वच नागरिकांसाठी आवश्यक असतो. अशा वेळी काही विशेष लोकांना विशिष्ट ज्ञानशाखेत कायद्याचे ज्ञान प्राप्त होऊन कसे चालेल? ज्ञान ही सर्वोच्च शक्ती असेल तर ती एकाच विद्याशाखेत कसे प्राप्त होईल असा प्रश्नही त्यांनी उपस्थित केला आणि म्हणून आंतरविद्याशाखीय अभ्यासक्रमाची आवश्यकता आहे आणि त्याचाच भाग म्हणून सीबीसीएसच्या पद्धतीचा अवलंब करणे आजच्या काळात आवश्यक असल्याचे प्रतिपादन त्यांनी केले. त्यानंतर विद्यार्थी प्रतिनिधी आलोक तिवारी आणि मिहीर देसाई यांनी विद्यार्थ्यांसमोरील प्रशासकीय आणि शैक्षणिक अडचणी व आव्हाने याविषयी मांडणी केली. या सत्रातील समारोपाच्या भाषणात डॉ. अत्रे यांनी ब्रिटिशपूर्व व ब्रिटिशकालीन शैक्षणिक पद्धतीचा तुलनात्मक आढावा घेऊन सांगितले की, ब्रिटिशांनी असा भ्रम निर्माण केला की, ते येण्यापूर्वी भारतात काहीच नव्हते. तथापि, ब्रिटिशकालीन शिक्षणव्यवस्थेचे संशोधन केल्यानंतर असे निदर्शनास येते की, तत्पूर्वीचे ज्ञानसंचित समृद्ध होते आणि शिक्षणपद्धतीही सर्वसमावेशक होती आणि याविषयी डॉ. धर्मपाल यांनी आपल्या पुस्तकात पुराव्यानिशी मांडले आहे. ब्रिटिशपूर्व या देशात लाखो शाळा होत्या; करोडो विद्यार्थी शिकत होते; शिक्षणव्यवस्था उच्च दर्जाची होती. परंतु भारतीयांचा सांस्कृतिक आणि अध्यात्मिक कणा मोडल्याशिवाय आपण सत्ता गाजवू शकणार नाही; हे ब्रिटिशांनी ओळखले आणि मेकॉलेने शिक्षणाला सत्तेचे साधन

बनविले. म्हणूनच म. गांधी म्हणाले Britishers unrooted the knowledge tree in India तर मॅक्समूलर म्हणाला की, शिक्षणाच्या माध्यमातूनच आपण सत्ता गाजवू शकतो. हे एवढं सगळं लख्ख प्रकाशाएवढं स्वच्छ असताना आपण शिक्षणाच्या भारतीयीकरणाबद्दल गप्प कसे आहोत? किंवा बोलत का नाही? याचा अर्थ मी पारंपारिक ज्ञानाचा पुरस्कर्ता आहे; असे नव्हे. मात्र हे ज्ञान कालसापेक्ष बनविले पाहिजे. त्याला देशानुकूल बनविले पाहिजे. आपल्या ज्ञानाचा वारसा ओळखला पाहिजे आणि तो आपण जपलाही पाहिजे. आम्हाला पाश्चात्य अभ्यासक, विचारवंत, तत्त्ववेत्ते यांचा परिचय असतो. मात्र भारतीय अभ्यासक, विचारवंत, तत्त्ववेत्ते यांची ओळख नसते. याचा अर्थ ते आपल्याकडे नव्हते असा नव्हे. आम्ही त्यांच्याकडे दुर्लक्ष केले, ही वस्तुस्थिती आहे. ते पुढे म्हणाले की जर्मनीत आजही सगळ्यात जास्त संस्कृत भाषा शिकवली जाते. पण भारतात ती ज्ञानभाषा एका विशिष्ट वर्गापुरती बंदिस्त झाली. प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत करावे असे महात्मा फुलेंनी हंटर कमिशनपुढे साक्ष देताना सांगितले. पण आरटीई येण्यासाठी २०१० उजाडले. आजही ६.२ कोटी बालक शाळाबाह्य आहेत. मग अशा देशाला भवितव्य काय असणार? प्रत्येक नागरिकांना किमान शिक्षण देण्याची जबाबदारी ही शासनाची आहे. असे असताना जीडीपीच्या केवळ २.७ टक्के खर्च शिक्षणावर केला जातो. जो किमान ६ टक्के तरी असायला हवा. आज किमान २० लाख शाळा असण्याची आवश्यकता आहे. प्राथमिक शिक्षणाची ही अवस्था आहे. अशा वेळी दूधच नसताना आपण सायीची अपेक्षा करतो आहोत. उच्च शिक्षण हे सर्टिफिकेट किंवा डिग्रीसाठी नको; तर अभ्यास आनंदासाठी असायला हवा. शिक्षण मुक्त हवे; बंदिस्त नको. जीवन हे विविधरंगी म्हणजे आंतरविद्याशाखीयच आहे आणि म्हणून ते इंडिपेंडट आणि इंटरडिपेंडंट असायला हवे. जे जे परदेशी आहे; त्याचे भारतीयीकरण झाले पाहिजे. त्यासाठी प्रत्येकाने 'नेशन फर्स्ट' ही भूमिका घेतली पाहिजे. अशी व्यापक भूमिका त्यांनी मांडली. शेवटी डॉ. विजय मोरे यांच्या आभारप्रदर्शनाने सत्राची सांगता झाली.

### Technical Session - II

या दुपारनंतरच्या सत्रामध्ये "Global Scenario of Choice Based Creadit System with special resference to cross functional jobs Today" या विषयावर डॉ. मिलींद मराठे यांनी आपले विचार मांडले. प्रारंभी प्रा. अमित जोशी यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. यावेळी ते म्हणाले की, आज जगात बहुतांशदेशात 'सीबीसीएस' पॅटर्न राष्ट्रीय पात्रतेची चौकट म्हणून स्वीकारण्यात आला आहे. तेथे विद्यार्थी आपल्या आवडीनिवडीप्रमाणे केव्हाही, कोठेही, कोणत्याही विद्याशाखेला प्रवेश घेऊ शकतो. तेथे थिअरीपेक्षा प्रॅक्टीकलला महत्त्व दिले जाते. कारण प्रॅक्टीकलशिवाय थिअरी अर्थहीन आहे आणि म्हणून तेथे वेळेचा अपव्यय अजिबात होत नाही. तेथे एटीकेटी, फेल अशा भानगडी नाहीत. त्यांच्या कामाप्रमाणे त्यांना त्यांचे क्रेडिट दिले जाते. तेथे विद्यार्थी आणि शिक्षक यांच्यातील संवादाला महत्त्व दिले जाते. शिक्षणात अद्ययावत साधने आणि अद्ययावत कौशल्य दोन्ही महत्त्वाची आहेत आणि म्हणून भारतीय शिक्षण व्यवस्थेने नवीन ज्ञान, कौशल्ये, तंत्रे व तत्त्वे यांचा स्वीकार केला पाहिजे. नव्या टेक्नॉलजीसोबत आपला माईंडसेट बदलण्याची आवश्यकता आहे. भारततही massive online open course स्वीकारणे आवश्यक आहे. भारताने 'स्वयंम' उपक्रमाचा स्वीकार करून त्या दिशेने पाऊल टाकले आहे. ही बाब स्वागतार्ह आहे. अभ्यासक्रमात कोअर सब्जेक्ट, इलेक्टीव्ह सब्जेक्ट, नॉन इलेक्टीव्ह सब्जेक्ट असे वर्गीकरण केले पाहिजे. विद्यार्थ्यांने परंपरेच्या नावाखाली मेंदूचा गुलाम बनता कामा नये. कारण काही न शिकणे हे सुद्धा एक शिकणेच असते. हे सूत्र लक्षात घेऊन नाविन्याचा स्वीकार केला पाहिजे. जीवनात इन्वेंशनबरोबरच इनोवेशन आवश्यक आहे असे प्रतिपादनही त्यांनी केले.

त्यानंतर डॉ. विजय मोरे यांच्या आभार प्रदर्शनानंतर या सत्राची सांगता झाली.

### आभार सत्र

या सत्रात प्रारंभी ग्रंथपाल डॉ. श्रीनिवास आठल्ये यांना ग्रंथालयशास्त्रात डॉक्टरेट मिळाल्याबद्दल त्यांचा डॉ. चंद्रशेखर वझे यांच्या हस्ते यथोचित सत्कार करण्यात आला. या सत्रात प्राचार्या डॉ. अनुजा पळसुलेदेसाई यांनी आपले मनोगत व्यक्त केले. 'सीबीसीएस' सारखा विषय हा थोडासा किचकट आणि गुंतागुंतीचा असल्याने आपला माईंडसेट बदलण्यासाठीच डॉ. चंद्रशेखर वझे यांना आभाराच्या भाषणाला निमंत्रित करण्यात

आल्याचे त्या म्हणाल्या. त्यानंतर प्रा. अमित जोशी यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. त्यावेळी डॉ. वझे यांनी अनेक हलकेफुलके दाखले देत श्रोत्यांना आपलेसे केले. ते म्हणाले की पान, पोळी, घोडा हे वेगवेगळे असले तरी त्यात एक समान गोष्ट आहे; ती म्हणजे यांना सतत फिरवण्याची आवश्यकता असते आणि म्हणून माणसाचे मन व जीवनही सतत प्रवाही असले पाहिजे. ते थांबले की संपले. विद्यार्थ्याने 'कामयाबी हसिल' करण्याऐवजी 'काबिल' बनणे आवश्यक आहे. गुणवत्ता ही व्यक्तिसापेक्ष असते. त्यामुळे एकाच साच्याचे विद्यार्थी बनले पाहिजेत ही अपेक्षा करणे चुकीचे आहे. शिक्षण हे विद्यार्थीकेंद्रित हवे. प्रवाहाबरोबर प्रवाहित असले पाहिजे. त्यामुळे 'सीबीसीएस' सारख्या उपक्रमाला विरोध न करता त्याचा स्वीकार करणेच उचित असल्याचे त्यांनी प्रतिपादन केले. समाजात काही माणसे ही स्वतः होऊन पुढाकार घेत नाहीत पण ते इतरांच्या पुढाकाराने प्रवाहित होत असतात. त्यामुळे त्यांचा फारसा गवगवा करण्याची आवश्यकता नाही. प्रत्येकाने 'तूच तुझ्या जीवनाचा शिल्पकार' या न्यायाने पुढे जायायला हवे. प्रत्येकाने आपल्या आरोग्याची काळजी घ्यावी. जीवनातील ताणतणााव बाजूला सारून तणावमुक्त जगण्याचा प्रयत्न करावा असा सल्लाही त्यांनी दिला. माणससाने ज्ञानपिपासू बनत असताना सतत आपल्या बुद्धीला धार देण्याची आवश्यकता असल्याचेही त्यांनी सांगितले. 'विद्वान सर्वत्र पूज्यतेः' असेही ते म्हणाले. त्यानंतर डॉ. विजय मोरे यांनी मान्यवर पाहुण्यांचे व उपस्थितांचे आभार मानल्यानंतर कार्यक्रमाची सांगता झाली.

या चर्चासत्रासाठी समन्वयक डॉ. प्रिती सोनी यांनी कार्यक्रमाचे नीटनेटके व पद्धतशीर आयोजन केले. प्रा. दिलीपकुमार मठपती यांनी नाव नोंदणीची जबाबदारी सांभाळली तर डॉ. सुभाष पंडित व राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक यांनी बैठक व्यवस्था सांभाळली. त्याचबरोबर कार्यालय अधिक्षक शशिकांत गाणार, दीपक सांगलीकर, सुनिल कदम, शशिकांत तिरमारे, कल्पना केळुसकर, सुरेंद्र आंब्रे, उमेश देशमुख, अनिल गायकवाड, मालू खंडागळे, चिंतामणी खरपडे इ. नी कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी मोलाचे योगदान दिले.

यावेळी कार्यक्रमाला राष्ट्रीय शिक्षण संस्थेचे श्री. शशिकांत कर्डेकर, डॉ. शरद धर्माधिकारी, श्री. विद्याधर शास्त्री, श्री. शिरीष फडके इ. आजी माजी पदाधिकारी तसेच प्राध्यापक, शिक्षक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

■■■

## झाला आजचा प्रकाश,
## जुना कालचा काळोख

वास्तविक पाहता बदल ही जीवनातील सर्वात शाश्वत गोष्ट आहे. जो काळानुरुप बदलला तोच या जीवनरूपी समुद्रात तरला! अन्यथा परिस्थिती कठीण! स्वतःमध्ये, स्वतःच्या विचारांमध्ये, स्वतःच्या वर्तनामध्ये, दृष्टिकोनामध्ये बदल घडविणे हे अनिवार्य आहे आणि तो बदल सकारात्मक असेल या विचाराशी प्रत्येक व्यक्तीने कटीबद्ध असणे अत्यावश्यक आहे.

**डॉ. अनुजा पळसुलेदेसाई**

'कोरोनायन'मधून साभार

# पुस्तक परिचय

**पुस्तकाचे नाव** : कोरोनायन
**लेखिकेचे नाव** : डॉ. अनुजा पळसुलेदेसाई
**प्रकाशन संस्था** : मोरया प्रकाशन, डोंबिवली
**प्रकाशन वर्ष** : २०२० (पहिली आवृत्ती)
**एकूण पाने** : १९२
**एकूण प्रकरणे** : यात ६० लेख आहेत.

२०२० मध्ये कोरोनाचं आगमन झालं आणि प्रत्येकाच्या आयुष्यात एक विस्मयकारक कालखंड सुरू झाला. मग थाळ्या वाजवणे, टाळ्या पिटणे, दिवे लावणे असले अनेक प्रकार एका पाठोपाठ एक पुढे येऊ लागले. त्यातील नाविन्यामुळे एक प्रकारची त्यात गंमत वाटून राहिली. शास्त्रीय कारणमीमांसा कोण करतोय हो? शिवाय मागून सुद्धा न मिळणारी दीर्घकालीन सुट्टी आयतीच पदरात पडली. मग काय, नुसती धमाल! रेसिपी, फोटोसेशन, चॅलेंजेस, केक, गाणी, कविता, व्हिडीओ रेकॉर्डिंग, क्विझ, ऑनलाईन मिटींग्ज यांना नुसता ऊत आला.

पण ढवळलेलं पाणी जसं हळूहळू शांत होत जातं तसतसा हा कृत्रिम उत्साहाचा झरा शांत होत गेला आणि परिस्थितीचं गांभीर्य समोर उभं ठाकलं. मग काम ठप्प, आवक बंद, फिरणं बंद, नोकऱ्या गेल्या, छंद बुडाले, चक्रे थांबली... पुढ्यातील अन्नाचे ताटापासून ओठांपर्यंतचं अंतर लांबलचक वाटू लागलं... तसा निराशेचा तवंग पसरला. अनिश्चितीचा काळ छाती दडपवू लागला आणि ताणतणाव जाणवू लागला.

अशा वेळी नेमकं कोरोनायन पर्व सुरू झालं. एकेक सकारात्मक ऊर्जेचा लेख इंटरनेटच्या महाजालावर उगवू लागला आणि नकळतपणे जमा झालेलं, निराशेचं, निस्सहायतेचं आणि नकारात्मक भावनांचं मळभ दूर होऊ लागलं. याचं सर्व श्रेय जातं डॉ. अनुजा पळसुलेदेसाई यांना.

डॉ. अनुजा पळसुलेदेसाई यांचा मूळ पिंड शिक्षकाचा. संशोधनपर लिखाण करण्यात त्यांना स्वारस्य. अर्थशास्त्र विषयात त्यांनी पीएच.डी. प्राप्त केलेली. पण दुर्मुखलेला चेहरा करून बसणे त्यांच्या स्वभावातच नाही. रोज वेगवेगळ्या, उलटसुलट बातम्या कानावर येत होत्या. सोशल मिडिया यात गोंधळाची भर घालत होता. घुसमट वाढत होती. तेव्हा त्यांनी ठरवलं, लेखणी उचलायची आणि विचारांना जागा करून द्यायची आणि मग एक नाही, दोन नाही, सलग साठ ललित लेखांची माला गुंफली गेली. ललित लेखनाचा त्यांचा हा पहिलाच प्रयत्न! पण त्यातही कमालीच्या बाहेर त्या यशस्वी झालेल्या दिसतात.

**आवडलेला भाग :**

या लेखमालेचे विषयसुद्धा वेगवेगळे होते. कधी जनतेला सूचना, कधी शासनाला कानपिचक्या, कधी कोविड योद्ध्यांचे कौतुक असे अनेक विषय मिश्किलपणे त्यांनी मांडले. सोशल मिडियावरील वेगवेगळी चॅलेंजस, रेसिपी, सिंगिंग, जुने फोटो तऱ्हेतऱ्हेच्या गोष्टीवर त्यांनी हसतहसत भाष्य केले आहे. त्यांच्या लेखांची काही शीर्षकच या दृष्टीने पाहण्यासारखी आहेत. उदा. सेतू बांधा रे, इच्छा तिथे मार्ग, या जगण्यावर शतदा प्रेम करावे, परीक्षेची अग्निपरीक्षा, माझी वारी माझा विठोबा, टाळेबंदीची फलश्रुती.

एकूणच सोशल साईटवर सर्वप्रथम प्रसिद्ध झालेले सर्वच लेख वाचनीय झाले. वाचकांचा त्यांना भरघोस प्रतिसाद मिळाला यात नवल नाही. साधी सोपी भाषा, सुटसुटीत शब्दरचना व ओळींच्या मर्यादेत मांडलेला विचार ही या लेखांची वैशिष्ट्ये आहेत.

**हे पुस्तक इतरांनी वाचावे. कारण,**

हे लेख 'कोरोनायन' या नावाने पुस्तकरूपात प्रसिद्ध झाले आहेत. या पुस्तकाला डॉ. भारती निरगुडकर यांची प्रस्तावना लाभली आहे. यावरूनच त्यांच्या दर्जाचा अंदाज येतो. आता कोरोनाचं भय कमी झालंय. अशा वेळी या पुस्तकाला संदर्भ ग्रंथाचा दर्जा प्राप्त होतो आणि म्हणूनच सर्वांनी ते एकदा तरी जरूर वाचावे.

**डॉ. श्रीनिवास आठल्ये**
ग्रंथपाल

■■■

**पुस्तकाचे नाव** : भटकंती, रायगड जिल्ह्याची (प्रवास वर्णन/ १३५१६)

**लेखकाचे नाव** : प्र. के. घाणेकर

**प्रकाशन संस्था** : स्नेहल प्रकाशन

**प्रकाशन वर्ष** : २००७ (पहिली आवृत्ती)

**एकूण पाने** : ३६८ पाने आहेत. त्यात काही चित्रवर्णन आहे व किल्ल्यांचे नकाशे आहेत.

**एकूण प्रकरणे** : यात १८ प्रकरणे आहेत. त्यात रायगड जिल्ह्यातील तालुका यांचे सुंदर वर्णन केले आहेत.

**आवडलेला भाग** : पान क्र. ८४ वरील कनकेश्वरची वनराई

हा भाग कनकेश्वरची वनराई या अलिबाग तालुकात असलेल्या कनकेश्वर डोंगराची माहिती सांगत आहे. या कनकेश्वर डोंगरातील वनराईमध्ये अभ्यास करून पुण्याचे डॉ. हेमा द. साने यांनी यात पीएच.डी ही पदवी मिळवलेली आहे. यात एक देवकालीन घटनेचा प्रसंग या वनराईत घेतला आहे तो यात नमूद केला आहे व कनकेश्वर डोंगरातील अनेक जागांचा उल्लेख केला आहे.

**पुस्तकातील आवडलेली वाक्ये :**

धन्य सुग्राम कनकेश्वर । कनगिरीचे माथ्यावर ।
वृक्षराजी मनोहर । नानाविध दिसतसे ।।
व्याघ्रेश्वर पूर्व द्वारी । पालेश्वर दक्षिण द्वारी ।
पायूबाई पश्चित द्वारी । उत्तर द्वारी गायमुख ।।
येथे श्रीरामसिद्धी विनायक । ताफ्यांचा नाशक ।
चतुर्मुक्तीचा दायक । ऋद्धीसिद्धीसहित असे ।।

**हे पुस्तक इतरांनी वाचावे. कारण,**

या पुस्तकात संपूर्ण रायगड जिल्ह्याची माहिती सुंदर भाषेत मांडलेली आहे. यात रायगड जिल्हाशी संबंधित सर्व घडामोडींचे वर्णन केले आहेत. या पुस्तकात रायगड जिल्ह्याचे सर्व पर्यटन स्थळांची माहिती व तेथील असणाऱ्या सुखसोयींची माहिती सुंदर पद्धतीने मांडलेली आहे. रायगड जिल्ह्यातील पर्यटन स्थळांची ऐतिहासिक माहिती व घडामोडी, तेथील पत्ते, दूरध्वनी क्रमांक इ. या पुस्तकात दिली आहे. हे पुस्तक संपूर्णपणे सहलीसाठी, सुंदर पर्यटन स्थळे पाहण्याबाबत सर्वात सोयीचे पुस्तक आहे.

**चिराग संतोष पाटील**
एफ.वाय.बीकॉम

■■■

**पुस्तकाचे नाव** : बाहुल्या (कथा ११३९७)

**लेखकाचे नाव** : डॉ. सौ. सुनीति साफळे

**प्रकाशन संस्था** : प्रतिमा प्रकाशन, अरुण पारगावकर

**प्रकाशन वर्ष** : २०१०

**पुस्तकाची आवृत्ती** : आवृत्ती पहिली, २ ऑक्टोबर २०१०

**एकूण पाने** : १७६

**एकूण प्रकरणे** : ११

**आवडलेला भाग** :

मला पुस्तकातील 'प्रदूषण' या कथेतील ''मुकाट अंधारलेल्या वाटांवरून मिणमिणत्या कंदिलाच्या उजेडात गाडी घुंगरु, वाजवीत धावत राहिली. ते घरी पोहोचले तेव्हा झुंजूमुंजू झालं होतं.'' हा भाग आवडला.

**पुस्तकातील आवडलेली वाक्ये :**

मला प्रदूषण या कथेतीलच एक कवितेतील एक वाक्य आवडले.

''या काटेरी फांद्यांची जाळी तोडून त्याआड दडलेल्या खुळ्या आकाशाचा... एक तरी तुकडा पाहू दे मला.''

**हे पुस्तक इतरांनी वाचावे. कारण,**

वात प्रत्येक कथेत आपण कुठे ना कुठे आपल्यालाच बघू. सामान्य माणसाची जीवनशैलीमधील काही क्षण यात लेखिकेने सांगितले आहेत आणि तेही अगदी सोप्या शब्दात.

**माधुरी रनाळकर**
एफ.वाय.बी.ए.

■■■

**पुस्तकाचे नाव** : मरण स्वस्त होत आहे (क्र. ५९७१)
**लेखकाचे नाव** : बाबुराव बागूल
**प्रकाशन संस्था** : प्रकाश विश्वासराव, लोकवाङ्मय गृह, भूपेश गुप्ता भवन, सायनी रोड, प्रभादेवी, मुंबई
**प्रकाशन वर्ष** : जून २००५
**पुस्तकाची आवृत्ती** : चौथी आवृत्ती
**एकूण पाने** : १३३
**एकूण प्रकरणे** : ११
**आवडलेला भाग** :

आई ही कथा आवडली. त्यामध्ये एका विधवा आईचे प्रेमात पडणे. त्यानंतरची समाजाकडून मिळणारी वागणूक लेखकाने आई या कथेत उतरवली आहेत.

**पुस्तकातील आवडलेली वाक्ये :**

भूक या कथेतील सटवा या लहान मुलाचे बोबडे बोल मला आवडले. मी आईसाठी नागलीची गलम भाकली आणली आहे.

**हे पुस्तक इतरांनी वाचावे. कारण,**

मरण स्वस्त होत आहे. अगदी या शीर्षकाप्रमाणे लेखकाने सामान्य माणसाची होणारी घुसमट, व्यथा मांडली आहे. विधवा स्त्रियांसाठी किंवा वेश्या स्त्रियासाठी असलेली समाजाची क्रूरता या पुस्तकात मांडली आहे.

**सायली सुरेश आंबेडे**
एफ.वाय.बीकॉम.

■■■

**पुस्तकाचे नाव** : समग्र कोकण दर्शन
**लेखकाचे नाव** : श्रीनिवास घैसास
**प्रकाशन संस्था** : मनोरमा प्रकाशन
**प्रकाशन वर्ष** : जुलै २००९
**पुस्तकाची आवृत्ती** : जुलै २००९
**एकूण पाने** : ३८४
**एकूण प्रकरणे** : १२
**आवडलेला भाग** :

कोकणभूमी म्हणजे भारतमातेच्या कोंदणातील एक हिराच होय. या कोकणभूमीवर निसर्गाने सौंदर्याची अशी उधळण केली आहे की 'घेशी किती दो कराने' अशी अवस्था या कोकणभूमीची झाली आहे. जगापासून काहीशी दूर असणारी कोकण रेल्वे होण्यापूर्वी त्या ठिकाणी जाणं हेदेखील आव्हान ठरणारी ही भूमी पाहिली की एखादं रानात उगवलेलं सुंदर फूल जसं आपल्याच मस्तीत जगत असतं, वाऱ्यावर डोलत असतं, त्याला इतर जगाची पर्वा नसते, याप्रमाणेच कोकणभूमीचं देखील आहे. ती सदैव असते आपल्या मस्तीत! आपल्या धुंदीत!

**हा भाग आवडला. कारण,**

या भागामध्ये कोकणभूमीची तुलना ही एका फुलाशी केली आहे. तसेच या कोकणभूमीला हिऱ्याची उपमा देण्यात आलेली आहे.

**पुस्तकातील आवडलेली वाक्ये :**

१) त्या म्हणजे एकीकडे कमालीची सुबत्ता तर दुसरीकडे कमालीचे दारिद्र्य!
एकीकडे प्रचंड कॉंक्रिटीकरण तर दुसरीकडे घनदाट जंगल!

२) बदलापूर-ठाणे जिल्ह्यातील हे आणखी एक देखणे गाव! आता या गावानेही कात टाकली असून शहरी रूप धारण केले आहे.

३) भाईंदर-आजही हे आकर्षण कायम असले तरी त्या धर्तीवर आता अन्यत्र अशा मनोरंजन नगरी उभ्या राहू लागल्या आहेत.

**हे पुस्तक इतरांनी वाचावे. कारण,**

पर्यटन स्थळांची व धार्मिक स्थळांची माहिती अगदी सुलभतेने व साधेपणाने सांगितली आहे. तसेच तेथील वाहतूक सुविधा, राहण्याच्या सोयी तसेच एस.टी.डी. कोडबद्दल माहिती दिली आहे व मुंबई, ठाणे, रत्नागिरी, रायगड, सिंधुदुर्ग या जिल्ह्यातील पर्यटन स्थळांची माहिती होईल. तसेच संपूर्ण कोकण दर्शन झाल्याचा अनुभव मिळेल.

**रोहित शंकर पांगम**
एफ.वाय.बीकॉम.

■■■

**पुस्तकाचे नाव** : आरोग्याचा अर्थ
**लेखकाचे नाव** : डॉ. आनंद कुलकर्णी
**प्रकाशन संस्था** : इंडियन एज्युकेशन सोसायटीची महात्मा फुले कन्याशाळा, दादर, मुंबई
**प्रकाशन वर्ष** : १७ जानेवारी १९९९
**पुस्तकाची आवृत्ती** : दुसरी आवृत्ती १९८८
**एकूण पाने** : १९०
**एकूण प्रकरणे** : १८४
**आवडलेला भाग** :

आज आपण बघतो की समाजातले दैनंदिन व्यवहार ठप्प आहेत. नाही म्हणायला, कुठे कुठे तुरळकपणे ते चालताना दिसतात. संकट येणारच. त्याला तोंड दिलं पाहिजे. त्याचा मुकाबला केला पाहिजे. लो. टिळक म्हणतात की आभाळ जरी कोसळलं तरी त्यावर पाय रोवून मी उभा राहीन. तोच आदर्श डोळ्यापुढे ठेवून 'सायंतार्‍या'च्या १८व्या अंकाची आम्ही सिद्धता केली आहे. १७व्या अंकाला जोडूनच हा १८वा अंक आम्ही प्रकाशित करायचं ठरवलं आहे.

आता तुम्ही म्हणाल की महाविद्यालयच जर बंद होतं, उपक्रम राबवलेच गेले नाहीत तर मग छापण्यासारखं आहेच तरी काय? मग अंक वाचा म्हणजे तुम्हाला कळेल. सर्वजण घरी होते पण स्वस्थ नव्हते. मग ते विद्यार्थी असोत की प्राध्यापक. कुणी ऑनलाईन कोर्स पूर्ण केला. कुणी स्पर्धेत बक्षिस मिळवलं. कुणी वेबिनारमध्ये सहभागी झाले. कुणी प्रश्नमंजुषात प्रमाणपत्रे मिळवली. कुणी कार्यशाळा आयोजित केल्या. कुणी लिखाण केलं, पुस्तक प्रकाशन केलं आणि हे सर्व घरच्या घरी बसून, ऑनलाईन पद्धतीने, बरं का! आहे की नाही हे कौतुकास्पद!

तर या सर्वांचा लेखाजोखा प्रस्तुत अंकात घेतला आहे. जरी तो जोड अंक असला तरी तो अ-जोड अंकच आहे, याची प्रचिती तुम्हाला येईल.

लवकरच सर्व काही सुरळीत सुरू होईल अशी आशा बाळगू या. तोपर्यंत आपले कुटुंब, आपली जबाबदारी नीट पार पाडू या.

धन्यवाद!

**- डॉ. श्रीनिवास आठल्ये**

# From Principal's Desk

Dear Readers,

Let me begin by congratulating the achievers. I hope your achievements at the college and university will lead you to greater achievements in future life wherever you are, and you will do the country proud.

I take this opportunity to present this brief report of the college activities during the year 2020-21. During this academic year, the entire world has witnessed worldwide pandemic of COVID-19. This is changed our life style. The traditional teaching learning in class room has transformed into Online Teaching. Almost entire year, the we have observed online teaching learning method with the help of technology. Thanks to Zoom and Internet and Digital Devices! Even the examinations were conducted online. The entire exercise of online teaching and online examination was difficult task for the teachers as well as to students. But with great determination and zest towards work our efforts where dedicated to achieve the goal and we became successful in that. This year we have admitted 726 students in the college at F.Y., S.Y. , T.Y.B.A. and B.Com level. Not only our students but even teaching and non teaching members of staff have appeared for various online and competitions. Mr. Omkar Ghadigaonkar in University level from S.Y.B.Com class has won the _____ prize inter-collegiate poster making competition organized by Adv. Deshpande college of Commerce one of our non teaching staff Mr. Chintu Lahu Kharpade has achieved degree of B.A. during this year from University of Mumbai. During the period of lockdown we has arranged the online training programmes for teachers and students too.

Our college jointly with Rashtriya Shikshen Sanstha has arranged 2 Days online workshop for teachers on Writing better MCQ's based on Bloom's Texonomy on 18-19 Jan. 2021.

No doubt, the entire academic year, with all the strengths and constraints, was task for all us. I take this opportunity to express my gratitude for offering helping hand and timely guidance by authorities of Rashtriya Shikshan Sanstha, and the Teaching and Non-Teaching members of staff. My students, my colleagues were of great help during the entire year. My best compliments to all of them.

विद्यार्थी मित्र-मैत्रिणींनो,

कोणत्याही दृश्य व्यक्तीला शक्य नसलेले सर्व विश्वाची गती रोखण्याचे किंबहुना गतीला स्वल्पविराम देण्याचे काम या अदृश्य कोरोना विषाणूने केले व सर्व जगच महामारीच्या खाईत बुडाले. गेले २०२० हे वर्ष व सध्या चालू असलेले २०२१ हे वर्ष या दोन्ही वर्षी भारतानेही ही भयावह परिस्थिती अनुभवली. कोरोनाच्या साथीवर हळूहळू नियंत्रण मिळविणे कोरोना योद्धे समर्पित भावनेने अहोरात्र झटल्याने शक्य झाले व जनजीवन परत एकदा पुनश्च हरि ॐ म्हणत पूर्वपदावर येत आहे. परत एकदा नव्याने 'जुगाड' करून जे गमावले ते काही अंशी कमवायचे आहे. राष्ट्रकार्यास स्वतःला समर्पित करण्यास कटिबद्ध होण्याची वेळ आली आहे.

कोरोना संपला का? तर नाही, पण आपली मनोवृत्ती 'कोरोना गेला आहे' अशी झाली आहे. लसीकरण चालू असले तरी ते अजून तरी सर्वव्यापी झालेले नाही. आपण बेपर्वा का होतोय? बेफिकीरही झालो आहोत का? ही प्रत्येकाच्या अस्तित्वाची जबाबदारी आहे. म्हणूनच मास्क, सुरक्षित वावर आणि सॅनिटायझेशन या त्रिसूत्रीला पर्याय नाही. करोना हा सागरासारखा आहे. किनाऱ्यावर उभे राहिलो तर दूरवरून

अनेक लाटा आपल्याकडे येतात. बऱ्याचदा लाटा किनाऱ्यापर्यंत येईपर्यंत विरून जातात व रेतीवर उरतो तो फेस. करोनाची आजची समस्या या लाटांसारखी आहे. काळजी घेतली तर त्याचे रौद्ररूप विरून जाईल. केवळ थोडासा फेस उरेल. तो अतिसौम्य लक्षणांप्रमाणे समाजात पसरेल. कोरोनाची आजची समस्या या लाटांसारखी आहे. काळजी घेतली तर त्याचे रौद्र रूप विरून जाईल. केवळ थोडासा फेस उरेल. तो अतिसौम्य लक्षणांप्रमाणे समाजात पसरेल. कोरोना इतर आजारांप्रमाणे होईल. अति गंभीर होणार नाही. मात्र हे होण्याची किल्ली आपल्या हातात आहे.

मध्यंतरी वृत्तपत्र वाचनात आलेली एक गोष्ट आठवते. एका गावात एक साधू होते. त्यांची परीक्षा घेण्याचे टारगट मुलांनी ठरवले. हातात छोटासा पक्षी घेऊन ते साधूंसमोर गेले. हा पक्षी जिवंत आहे की मृत, हे अंतर्ज्ञानाने सांगा म्हणाले. योजना अशी की, जर साधू म्हणाले, तो जिवंत आहे, तर मुठीत दाबून पक्ष्याला मारायचे. ते म्हणाले, मृत आहे, तर मूठ उघडून त्याला सोडायचे. दोन्ही उत्तरात साधू फसणार होते. मुलांनी प्रश्न विचारला तसे साधू महाराज हसले आणि म्हणाले, तुमच्या मुठीतील पक्ष्याचे दैव आणि अस्तित्व तुमच्याच हातात आहे. टारगट मुले काय ते उमजली ! करोना रोखायचा तर ही साधूशिकवण खऱ्या अर्थाने जाणून घेण्याची वेळ आली आहे.

**डॉ. अनुजा पळसुलेदेसाई**

## इच्छा तिथे मार्ग

कोणतीही काम करावयाचे मनात असले म्हणजे काही तरी मार्ग सुचतोच. काम करायचे नसले म्हणजे अनेक सबबी पुढे करता येतात. अनेकांना आपले काम फार कठीण वाटते. पण या जगात कठीण असे काहीच नसते. 'यत्न तो देव जाणावा' या उक्तीला अनुसरून सकारात्मक विचारांवर अंमल केला तर अशा प्रयत्नांना ईश्वरसुद्धा मार्ग दाखवतो व सहकार्य करतो.

**- डॉ. अनुजा पळसुलेदेसाई**

'कोरोनायन'मधून साभार

# कोरोनाचे वर्ष

**डॉ. अनुजा पळसुलेदेसाई**
प्राचार्य

आज ९ मार्च २०२१. गेल्या वर्षी आजच्याच दिवशी महाराष्ट्रात पहिल्या कोरोना बाधित रुग्णाची नोंद झाली आणि भीतीने काळजाचा ठोका चुकला ! साता समुद्रापार असलेले कोरोना विषाणू महामारीचे सावट आपल्या राज्याचे दार ठोठवायला लागले आणि त्यानंतर २,४,१६, ६४ अशी कोरोना बाधित रुग्णांची संख्या वाढतच चालली. त्याकाळात आमच्या महाविद्यालयात चौथ्या सेमिस्टरच्या लेखी परीक्षा चालू होत्या. साधारण चार दिवसांची परीक्षा पार पडली होती आणि अचानक सोमवारी १६ मार्चला रात्री निर्णय आला उद्यापासून महाविद्यालये विद्यार्थ्यांसाठी पूर्णपणे बंद आणि बाकी कर्मचाऱ्यांसाठी ५०% क्षमतेने चालू राहणार. त्वरीत त्यावर अंमल झाला. स्पर्शातून होणारा फैलाव थांबविण्यासाठी त्वरीत बायोमॅट्रिक उपस्थितीची मशिने बासनात गुंडाळली गेली. सतत साबणाने हात धुणे, सुरक्षित अंतर बाळगणे याही प्रथा अंगी रुजवायला सुरुवात केली आणि मुख्य म्हणजे सुरक्षा मुखपट्टी-मास्क हा शरीराचा कवचकुंडल बनला. आणि त्यातच २२ मार्च रोजी पुकारलेला जनता कर्फ्युचा देशव्यापी निर्णय आणि तदनंतर सुरू झाली ती टाळेबंदीची - लॉकडाऊनची मारुतीच्या शेपटीप्रमाणे वाढत जाणारी शृंखला ती थेट आत्ता आत्तापर्यंत.

सुरुवातीचे काही दिवस घरात बसून आराम करण्यात, कुटुंबीयांबरोबर खेळीमेळीच्या वातावरणात गेले. परंतु जसाजसा टाळेबंदीचा काळ वाढत गेला तसतसे वातावरण तणावाचे बनत गेले. वर्क फ्रॉम होम, ऑनलाईन बँकिंग, ऑनलाईन भाजीपाला, धान्य मागवणे वगैरे अंगवळणी पडत गेले. तशातच ८ जूनपासून तुरळक प्रमाणात अनलॉकिंगचे आदेश आले. परत कार्यालयात जाऊन काम करायचे, नित्याचे रुटीन चालू करायचे यामुळे मनाला उभारी मिळत होती परंतु साथीचा जोरदार प्रादुर्भाव असताना स्वतःची व इतर कर्मचाऱ्यांच्या जिवाची काळजी घेत कार्यालय चालू करायचे याचे मनावर दडपणही होते. लगेचच संस्था कार्यालय, वाचनालय, प्रसाधन गृहे यांचे निर्जंतुकीकरण करून घेतले व शासकीय आदेशाच्या नियमांना अनुसरून कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीचे आळी-पाळीने नियोजन केले गेले व कार्यालय परत एकदा चालू झाले. काळजीग्रस्त अवस्थेत पण आता काम करायचेच या भावनेने प्रेरित होऊन कामाला सुरुवात झाली.

मध्यंतरीच्या काळात विद्यापीठाने-शासनाने अनेक निर्णय घेतले होते व आता त्यांच्या अंमलबजावणीची वेळ होती. कमीत कमी वेळात जास्तीत जास्त कार्यक्षमता दाखवून कर्तव्यदक्ष स्थानिक कर्मचाऱ्यांच्या मदतीने विद्यार्थ्यांचे नियमाप्रमाणे निकाल लावण्यात आले. ऑनलाईन पद्धतीने शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसाठी विविध विषयावर मार्गदर्शनपर कार्यशाळा आयोजित करण्यात आल्या. विद्यार्थ्यांचे निकाल विद्यार्थ्यांपर्यंत व्हॉटस्अॅप समुहाच्या व वेबसाईटच्या माध्यमातून कळविण्यात आले. आता प्रश्न होता तो दुसऱ्या व तिसऱ्या वर्षाच्या विद्यार्थ्यांच्या प्रवेशाचा आणि तोही विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष महाविद्यालयात न बोलवता. परंतु तंत्रज्ञानतज्ज्ञ जिज्ञासू संकटमोचक हनुमानाप्रमाणे उभे ठाकले. शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी या प्रक्रियेत मोलाचे योगदान दिले. माझ्या विचारातून व अनुभवातून कल्पना निघत असत व त्यावर अंमल मात्र माझ्या सहकाऱ्यांकडून होत असे. चुकत-अडखळत तंत्रज्ञानाचे सहाय्य घेऊन प्रवेश प्रक्रिया पार पाडली आणि आता सुरू झाली ती ऑनलाईन शिकवण्याची तयारी! झूम की गुगल मीट की क्लासरूम की अन्य काही! अनेक डिजिटल प्लॅटफॉर्मची जाचपणी व चर्चा घडू लागल्या व अखेर झूम अॅपद्वारे विद्यार्थ्यांचे प्रशिक्षण सुरू झाले ते आजतागायत चालू आहे. किंबहुना ऑनलाईन हे आता इतके अंगवळणी

पडलेज आहे की परीक्षासुद्धा ऑनलाईन पद्धतीने सहजरित्या पार पडल्या! अर्थात त्यातही अडथळे आलेच पण त्यावर उत्तमरित्या मात केली.

या कोरोनाने खूप शिकवले. नोकऱ्या गेल्या, वेतनकपात झाली, वेतनवाढ रोखली. आधी चार दिवस घरात बसणे आवडले, पण नंतर वैयक्तिक अवकाशावर आक्रमण होत असल्याची भावना दाटून आली. हे घरात असलेपणसुद्धा टोचू लागले. या काळात जिवंत राहण्याची धडपड जी मानवाने अश्मयुगात केली. ती या विषाणुयुगात सुद्धा अनुभवली. संकटला सुसंधीमध्ये कसे परिवर्तीत करता येईल व त्यातून आत्मनिर्भर होता येईल यावर संशोधन चालू झाले. कित्येक व्यवसाय बुडाले तर कित्येक व्यवसायांना उगमाची दिशा मिळाली. कितीही प्रगत तंज्ञत्रानाने समृद्ध झालो तरीही वैद्यकविश्वाच्या उघड्या पडलेल्या मर्यादा दिसल्या.

विद्यार्थ्यांच्या उपस्थितीविना महाविद्यालये भयाण वाटू लागली. महाविद्यालय संकुलातील निरव शांतता, वाचनालयातील शुकशुकाट भयाण वाटतो. सर्व वातावरण कधी गजबजून जाईल याकडे डोळे लागले आहेत. कधीकधी आशेचे किरण दिसून येतात पण तेवढ्यात कुठेतही काहीतरी विपरीत घडल्याची बातमी येते आणि पदरी येतो तो परत लॉकडाऊन. लहानपणी सापशिडी खेळायचो, तसे हे वर्ष! शिडी म्हणून थोडेसे वर जावे, तर ९८ व्या घरातून दोनच्या घरात आणून सोडणारा साप! तरीही या वर्षाकडे पाहताना काही गोष्टी आपण कमावल्या. व्यवसाय करण्याच्या पद्धती त्यांचे स्वरूप बदलले, वर्क फ्रॉम होम हा सेवा क्षेत्रात परवलीचा शब्द बनला, प्रत्यक्ष भेटून निष्पन्न न होणाऱ्या बैठका कमी झाल्या. कित्येक अनावश्यक खर्चांना कात्री लगावली गेली. यापुढे भेटायचे ते दृकश्राव्य माध्यमाच्या तरल स्क्रीनवर. आभासी व्हर्च्युअल अस्तित्व हेच आपले अस्तित्व झाले. कित्येक कार्यशाळा, परिषदा, परिसंवाद, मार्गदर्शन शिबिर ऑनलाईन झाली. अगदी आमच्या महाविद्यालयनेही आयोजित केली. सगळ्यात महत्त्वाची जाणवली ती म्हणजे माणसाची संकटावर मात करण्याची, त्यातही सुसंधी शोधण्याची सकारात्मक वृत्ती! अर्थात याला काही अपवाद होतेच! पण या संकट काळात जो होकारात्मक राहीला व डगमगला नाही तोच तरला! त्याचीच नौका किनाऱ्यापर्यंत पोहोचली! भविष्यात अनेक आर्थिक, समाजिक प्रश्न कोरोनाने उभे केले आहेत. पण त्यावरही निश्चितच मात करत सापशिडीचा हा डाव आम्ही नक्कीच जिंकू हा आहे आमचा निर्धार!

■■■

## • मना घडवी संस्कार •

शालेय जीवनात झालेले संस्कार हे आयुष्यभर पुरतात. आपल्या यशस्वी होण्यामध्ये, सुसंस्कारित होण्यामध्ये कुटुंबाइतकाच शाळेचाही सहभाग मोलाचा असतो. शाळेत विविध उपक्रम विद्यार्थ्यांवर कृतियुक्त संस्कार होण्यासाठी राबविण्यात येत असतात. कारण संस्कार हा जरी क्षणिक असला तरी तोच अनंतकाळ टिकणारा असतो.

**- डॉ. अनुजा पळसुलेदेसाई**

'कोरोनायन'मधून साभार

# भारतीय मजदूर संघाचे संस्थापक श्री. दत्तोपंत ठेंगडी

**श्री. शशिकांत गाणार**
कार्यालय अधिक्षक

श्री. दत्तोपंत ठेंगडी यांचा जन्म १० नोव्हेंबर १९२० रोजी महाराष्ट्रातील वर्धा जिल्ह्यातील आर्वी या गावी झाला. त्यांच्या वडिलांचे नाव बापूराव असून आईचे नाव जानकीदेवी होते. त्यांना नारायण नावाचा एक भाऊ व अनसूया नावाची धाकटी बहीण होती. आई-वडील धार्मिक वृत्तीचे असून श्रीदत्तात्रेयाचे उपासक होते.

श्रद्धेय दत्तोपंतजी यांचे अकरावी पर्यंतचे शिक्षण आर्वी नगरपालिका हायस्कुल येथे पूर्ण झाले. नागपूरच्या मॉरिश कॉलेजमधून पदवी, तर लॉ कॉलेजमधून एल एल बी पदवी प्राप्त केली.

आदरणीय दत्तोपंत ठेंगडी यांचा 'हिंदुस्थान सोशालिस्ट रिपल्बिकन असोसिएशन' या क्रांतिकारी संघटनेशी संबंध होता. इ.स. १९४२ पासून दत्तोपंत ठेंगडी यांनी देशसेवला वाहून घेतले. आजन्म अविवाहित राहून त्यांनी संघकामात मोठे योगदान दिले. संयुक्त राष्ट्र संघात त्यांनी भारताचे प्रतिनिधित्व केले होते. केरळ सारख्या कम्युनिस्टांच्या बालेकिल्ल्यापासून ह्यांच्या संघकामाची सुरुवात झाली आणि त्यांनी आपल्या कामाची छाप पाडून दाखवली. केरळ प्रांतात सर्वूदर संघकार्याचा प्रचार आणि प्रसार त्यांनी सहजपणे पोहचविला.

सन १९४८ ते १९४९ या कालावधीत त्यांच्याकडे आसाम प्रांताची धुरा सोपविण्यात आली. पूर्णपणे खिश्चन बहुल भागात म्हणजेच आताच्या एकूण ७ राज्यांमध्ये आणि बंगाल या सर्व ठिकाणी झंजावाती प्रवास करून त्यांनी संघकार्य दृढ केले आणि खंबीरपणे संघकार्य उभे केले. त्यांची कुशाग्र बुद्धी, दूरदृष्टी, कार्याप्रती तळमळ, एकनिष्ठता, प्रामाणिकपणा या त्यांच्या अंगभूत गुणांमुळेच त्यांनी या प्रांतातही आपल्या कामाचा ठसा उमटविला. त्यांच्या या गुणांचीच पारख करून त्यावेळी असणारे संघाचे द्वितीय सरसंघचालक श्री. गुरुजी यांनी त्यांना कामगार क्षेत्रात काम करण्याची सूचना केली.

खरे तर कामगार क्षेत्रावर कम्युनिस्टांचे वर्चस्व होते. कामगार क्षेत्र हे राजकारणी मंडळींच्या वर्चस्वाखाली होते. या क्षेत्रावर राजकारण्यांचा मोठा दबदबा होता. हे सर्व लक्षात घेऊनच आणि काँग्रेसला या माध्यमातून कम्युनिस्टांचा होणारा अडसर पाहून, काँग्रेसने आपली स्वतःची कामगार आघाडी म्हणवून इंटकची स्थापना केली. आपल्याला या क्षेत्रात राष्ट्रव्यापी कार्य करण्यसाठी ठेंगडी यांनी ईंटकचे कार्य हाती घेतले आणि कामगार समस्यांचे जवळून अवलोकन केले त्याचा अभ्यास सुरू केला. १९५०-५१ या कालखंडात ते इंटकचे मध्यप्रदेशाचे संघटन मंत्री होते. या कामगार क्षेत्राचे आंतर्बाह्य स्वरूप पाहून त्याचा सर्वांगीण अभ्यास करून त्यांनी २३ जुलै १९५५ रोजी भोपाळ येथे भारतीय मजदूर संघाची स्थापना केली. कामगार क्षेत्रात नव्या पर्वाचा प्रारंभ झाला.

भारतीय मजदूर संघाचा मुख्य हेतू कामगारांमध्ये राष्ट्राभिमान जागविण्याचा होता. म्हणून त्यांनी आपले ब्रीदवाक्य निश्चित केले. 'देश के हित मे करेंगे काम और काम का लेगे पूरा दाम'

राष्ट्रहित आणि उद्योगहित या दोन्ही आघाड्यांवर समान पद्धतीने काम करण्याचे धोरण ठरवून त्यांनी कामगारांचे प्रश्न हाताळताना आवश्यकतेनुसार समविचारी राजकीय पक्षाचा सहयोग घेऊन हे मजदूर संघटन आपले कार्य व्यापक स्वरूप होईल हे निश्चित केले. त्या बाबत त्यांनी प्रचलित राजकीय पक्षांशी अधिक जवळीक निर्माण करून आपल्या या क्षेत्राबद्दल त्यांच्या मनात विश्वास निर्माण केला. राजकीय पक्षांची उद्दिष्टे साध्य करून घेण्यासाठी कामगार आणि समस्त जनतेला वेठीस धरून संप करणे त्यांना मान्य नव्हते. त्यांनी आपल्या निश्चित केलेल्या राष्ट्रीय विचारांच्या तत्त्वाशी कधीच तडजोड केली नाही. त्यांच्या सामाजिक आणि कामगार क्षेत्रातील बहुमोल कार्याबद्दल भारत सरकारने त्यांना

पद्मभूषण हा सम्मान बहाल करण्याचे ठरविले. तशी घोषणाही करण्यात आली. परंतु आपल्या तत्त्वांशी पक्के असलेल्या श्री. दत्तोपंत ठेंगडी यांनी हा पुरस्कार स्वतःहून नाकारला.

दत्तोपंत ठेंगडी यांचे कार्य मजदूर क्षेत्रापुरते मर्यादित राहिले नाही तर त्यांनी सोबतच आपला देश कृषिप्रधान असल्याने या कृषिक्षेत्रातही त्यांनी बहुमोल कार्य केले आणि यासाठी त्यांनी भारतीय किसान संघाची १९७९ साली स्थापना केली. आपला भारत देश कृषिप्रधान देश असूनही राजकीय इच्छाशक्तीच्या अभावामुळे कृषीकडे आणि शेतकऱ्यांकडे दुर्लक्ष केले जात आहे. हे त्यांच्या लक्षात आले. या क्षेत्रातील महत्त्वपूर्ण कामगीरीसाठी त्यांनी अनेक देशांमधे प्रवास केला आणि तेथील नवनवीन तंत्रज्ञान जे आपल्या देशातील कृषिकर्मियांना पूरक होईल, त्याबाबतीत त्यांनी अधिक जागरुकता निर्माण केली. परंतु त्याचबरोबर सेंद्रीय शेतीचा अधिकाधिक आग्रह धरला.

त्यांच्या या सर्व कार्याची दखल घेऊनच तत्कालीन सरकारने १९६४ रोजी त्यांना राज्यसभेचे सदस्य केले. १९६४ ते १९७६ या कार्यकालात ते खासदार म्हणून कार्यरत होते. आणि त्यांनी संसदीय कामात आपला ठसा उमटविला होता. साधी राहणी आणि उच्च विचारसरणी, अभ्यासू वृत्ती स्पष्ट विचार त्यांच्या मूल्यांमुळेच ते आजही सर्वांच्या स्मरणात राहतात. ग्राम आधारित अर्थव्यवस्थेच्या पूर्ततेसाठी आणि स्वदेशी वस्तूंचा पुरस्कार करण्यासाठी त्यांनी १९९१ साली स्वदेशी जागरण मंचाची स्थापना केली. त्याचबरोबर सामान्य ग्राहक वर्गाची पिळवणूक होऊ नये, त्यांनाही न्याय मिळावा म्हणून त्यांनी अखिल भारतीय ग्राहक पंचायत या संस्थेची स्थापना केली.

जातिभेद, भाषाभेद आणि प्रांतभेद यामुळे आपला देश पोखरला जात आहे आणि या परिस्थितीवर मात करण्यासाठी त्यांनी १९८५ साली सामाजिक समरसता मंच आणि १९९२ साली सर्व पंथ समादर मंचाची स्थापना केली. आंतरराष्ट्रीय श्रमिक संघटनेच्या 'जिनिव्हा' येथे झालेल्या परिषदेत त्यांनी भारताकडून कामगारांचे प्रतिनिधित्व केले. याच सुमारास त्यांनी युरोप, आशिया आणि आफ्रिकेतील अनेक देशांचा प्रवास केला. तेथील कामगार चळवळीला त्यांनी प्रेरणा दिली.

दत्तोपंत ठेंगडी यांनी इंग्रजी, हिंदी, मराठी भाषेत एकूण १०४ पुस्तके लिहिली आहेत. त्यांचे Third way हे इंग्रजी तसेच कार्यकर्ता हे हिंदी ही पुस्तके अजरामर झाली आहेत. त्यांच्या अनेक आवृत्त्या निघाल्या आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ते अधिक जवळचे होते. त्यांच्या सोबत अनेकदा त्यांच्या कामगार सेना बाबत चर्चाही होत असत म्हणुनच त्यांनी 'आपले बाबासाहेब' हे पुस्तक खास त्यांच्यावर लिहिले आहे. दत्तोपंतांनी आपल्या हयातीत एक धोरणात्मक निर्णय घेतला होता की कोणत्याही व्यक्तीचा कधीच जयजयकार न होता केवळ भारत मातेचाच जयजयकार होईल. व्यक्तिपूजा ही त्यांना कधीच मान्य नव्हती. कथनी आणि करणी मध्ये त्यांनी कधीच फरक केला नाही. वंदनीय दत्तोपंत ठेंगडी यांनी आपले आयुष्य देशसेवेला वाहून घेतले होते. दि. १४ ऑक्टोबर २००४ रोजी त्यांनी या जगाचा निरोप घेतला. आज जरी ते आपल्यात नसले तरी भारतीय मजदूर संघा' च्या रूपाने ते सदैव प्रेरणा देत राहतील. नुकतीच त्यांची जन्मशताब्दी साजरी झाली त्या निमित्ताने त्यांच्या पवित्र स्मृतींना त्रिवार वंदन.

■■■

## पाऊले (लक्ष्मीची) चालती भारताची वाट

भारताची अर्थव्यवस्था नेहमी संकटकाळातच विकास पावते, हा अनुभव आहे. या संकटाच्या काळातसुद्धा भारतीय अर्थव्यवस्था परिणामकारक उपाययोजना केल्या तर तरून जाईल हे निःसंशय! भारताची ग्रामीण अर्थव्यवस्था कोरोनाच्या आर्थिक संकटावर मात करायला मदत करेल.

**- डॉ. अनुजा पळसुलेदेसाई**
'कोरोनायन'मधून साभार

# महामारीचा प्रसारक कोण ? इतिहास काय सांगतो ?

डॉ. विजय मोरे

मागच्या वर्षी जेव्हा कोरोना जगभरात वाढता होता म्हणजे जानेवारी २० ते मार्च २० या काळात. परदेशातून ९ मार्च २०२० रोजी आलेला प्रवासी कोरोनाचा रुग्ण सापडला. त्या आधी आपल्या देशाने फेब्रुवारीच्या सुरूवातीला जर भारतातील सर्व आंतरराष्ट्रीय विमान तळ प्रवासी वाहतुकीकरिता बंद केली असती किंवा फेब्रुवारी पासूनच विमानतळावर लक्षणांची तपासणी करून बाहेरून येणाऱ्या प्रवाशांना quorontine केले असते तर भारतात हा कोरोना विषाणू पसरू शकला नसता तो आपल्या आवाक्यात असता मात्र ह्या बाहेरून येणाऱ्या प्रवाशांमुळे व श्रीमंत वर्गामुळे देशातील गरीब वर्ग हा मागच्या वर्षभरापासून आर्थिक कोंडीत जीवन जगत आहे त्याच्या हातचे काम निघून गेले आहे.

त्यामुळे कोणतीही साथ जेव्हा येते तेव्हा तिचे जे खरे प्रसारक आहेत त्यांना वेळीच रोखले पाहिजे. मग ह्या साथीचे प्रसारक कोण आहेत विषाणू वाहक कोण आहेत हे पाहणे गरजेचे आहे.

महामारीचा व साथीचा सर्वात मोठा फटका हा गरीब वर्गालाच बसतो. अनेकदा या साथी पसरण्याचं कारण हे गरीब वर्गालाच समजलं जातं. कुठलीही रोगराईची साथ गरिबांच्या खांद्यावर बसून पाय पसरते. श्रीमंत आणि मध्यमवर्गीयांचं साधारणतः असंच म्हणणं असतं. मात्र इतिहास काही वेगळंच सांगतो.

खरंतर ''कुठलीही महामारी गरिबांच्या खांद्यावर बसून येते की श्रीमंतांच्या ?'' कुठल्याही देशातील मध्यमवर्गीय माणसाला तुम्ही हा प्रश्न विचारलात, तर तो तत्काळ उत्तर देईल.'' झोपड्यांमध्ये राहणारे लोक हे अस्वच्छ राहतात आणि हेच इतरत्र अस्वच्छता पसरवतात. यामुळंच ह्या वेगवेगळ्या रोगराईच्या साथी ह्या गावात शहरात पसरतात.''

**इतिहास काय ?**

मोठमोठ्या साथींचा आतापर्यंत जगात आलेल्या इतिहास पाहिल्यास आपल्याला काहीसं वेगळंच उत्तर मिळतं.

१६५० ते १८०० या सालादरम्यान पसरलेली प्लेगची साथ असो वा १५२० च्या दरम्यान कांजिण्या किंवा पिवळा ताप, रशियन फ्लू, एशियन फ्लू, कॉलरा १८१७ दरम्यानचा इंडियन प्लेग असो... या सर्व साथी पसरण्याचं व्यवस्थित अभ्यास केल्यास लक्षात येईल की, या मोठ्या प्रमाणात पसरलेल्या साथींचा पहिला विषाणू वाहक श्रीमंत वर्गच होता किंवा श्रीमंतीकडे वळणारा एखादा मध्यमवर्गीय त्याचा विषाणू वाहक राहिलाय.

जगाचा शोध घेऊ पाहणारे नाविक, काही व्यापारी, जहाज चालक किंवा जहाजावरील कर्मचारी, युद्धासाठी जाणारे किंवा युद्धाहून परतणारे सैनिक, पर्यटक, वसाहतवादाच्या प्रसारादरम्यानच्या वसाहतवादी देशांच्या व्यापारी कंपन्या, त्यातील अधिकारी, कर्मचारी इत्यादींच्या माध्यमातून या सर्व साथी साधारणतः पसरत आल्या आहेत. त्यानंतर संबंधित देशातील मध्यम वर्गाकडून खालच्या वर्गात किंवा इतर सामाजिक वर्गांमध्ये साथ पसरत जाते.

आता ज्या COVID 19 या कोरोना व्हायरसला रोखण्यासाठी जगातील प्रत्येक देश आज संघर्ष करत आहे, तो COVID 19 विषाणूसुद्धा परदेशी प्रवासाशी संबंधितांनीच पसरवलाय. त्यामध्ये काही पर्यटक, जगभरात हवाई प्रवास करण्याची क्षमता असणारा वर्ग, परदेशात काम करत असलेला वर्ग, जगभरात फिरणारे कलाकार, अभिनेते, गायक, खेळाडू, मोठे परदेशी नोकरदार यांचा समावेश आहे.

जागतिकीरण आणि नवउदारमतवादी अर्थव्यवस्थेचे फायदे घेत असलेल्या काही श्रीमंत लोकांच्या माध्यमातूनच आपल्या देशात व जगभरातील देशांमध्ये COVID 19 पसरलाय.

''श्रीमंत व मध्यमवर्गीयांमुळे ज्यांचे हातावर कुटुंबाचं पोट अवलंबून आहे अशा लोकांना गरीब वर्गाला याची लागण

झाली. जर आपण बारकाईनं निरीक्षण केलं तर आपल्या लक्षात येईल की ह्या श्रीमंत व मध्यमवर्गीयांमुळेच साथ पसरत गेलीये.'' शहरात झोपडपट्टीत राहणारा गरीब वर्ग कोरोना व्हायरसचा प्रथम वाहक नाहीये.

ज्यांच्या आयुष्यात आपल्याला अस्वच्छता दिसते, त्यांना आपण आजारांचं कारण मानतो, ते कुठल्याच साथीचे प्रथम वाहक नसतात.

या साथींचा प्रसार पाहता गरिबांमुळं आजारांचा प्रसार होतो, ही समजूत आपल्या डोक्यातून काढून टाकली पाहिजे. या मजूर, कामगार, झोपड्यांमध्ये राहणारा वर्ग यांच्याकडे यापुढेही तुच्छतेच्या नजरेनं पाहत बसणे हे योग्य नाही.

लॉकडाऊनमुळे सर्वाधिक फटका जगभरातील व भारतातील रोजंदारी करणारा मजूर, असंघटित क्षेत्रातील कामगार, गावखेड्यातील शेतकरी यांना बसलाय. मात्र ज्या आजारामुळं, साथीमुळं हे लॉकडाऊन करण्यात आलं, त्याला हा वर्ग अजिबात जबाबदार नाहीये.

आपल्याकडील सत्ताधारी या वर्गाकडं सहानुभूतीनं पाहत वेगवेगळ्या योजना लागू करत आहे, याच संवेदनशीलतेनं आणि तटस्थ नजरेनं या साथींच्या प्रसारच्या मूळ वाहकांना लक्षात घेतलं पाहिजे.

■■■

## वडिलांसाठी खास

वडील म्हणजे कुटुंबाचा आधारस्तंभ
वडील म्हणजे कष्टाची, उबेची, मायेची शाल
वडील म्हणजे घरातील सर्वजणांची संरक्षणाची ढाल
वडील म्हणजे चैतन्याचा, उत्साहाचा अखंड मनोरा
वडील म्हणजे मुलांवर मुक्त हस्ते माया उधळणारा
अथांग किनारा
वडील म्हणजे मुलीच्या मनातील, डोळ्यांतील अश्रू
अलगद झेलणारे प्रिय बाबा.
वडिलांचे गुणगान गाण्यास पडती हे शब्द अपुरे
वडिलांचे हे छत्र आपण सारे विनासायास असेच जपू रे

**डॉ. माधुरी रामधरणे**
मराठी विभाग

## न संपणारी प्रीत

निरोप घेऊन
गेला धनी माझा
जिवाचा राजा
लढवय्या ।।

निरोपाच्या क्षणी
शब्द ना, ना मिठी
आतुरली दिठी
वाटेकडे ।।

परी अवचित
काळ घाली घाला
घरधनी आला
तिरंग्यात ।।

हंबरडा नाही
शोक केला नाही
डोळ्यांतून वाही
अभिमान ।।

नच संपणारी
अबोल ही प्रीत
मिटल्या डोळ्यांत
चिरंजीव ।।

**डॉ. श्रीनिवास आठल्ये**
ग्रंथपाल

# करोना संसर्ग व अर्थव्यवस्थेतील बदल

**डॉ. सुभाष तातेराव पंडित**
अर्थशास्त्र विभाग

जगभरात मागील एक वर्षांपासून कोरोनाचा कहर सुरू आहे. जगभरातील लाखो लोकांना कोरोनाचा संसर्ग झाला असून, आतापर्यंत अनेक जणांचा बळी या विषाणूने घेतला आहे. जेव्हा हा विषाणू प्रथम चीनमध्ये सापडला, तेव्हा जगभरात राष्ट्रीय आणि आर्थिक संकुचितपणा दिसून आला होता. आज या विषाणूने जग बंद करून टाकले असून काही देशांची अर्थव्यवस्था खिळखिळी करून टाकणारी ही प्रचंड मोठी महामारी भारतात ही मोठ्या प्रमाणात पसरली आहे. भारतीय अर्थव्यवस्थेतील जवळपास सर्वच क्षेत्रावर मोठ्या प्रमाणात या कोरोना संसर्गाचे परिणाम झाले आहेत. आपल्या देशाचे पंतप्रधान, राज्याचे मुख्यमंत्री व त्यांचे सहकारी त्यांच्या अविश्रांत परिश्रम, सकारात्मक धोरणे यामुळे ही महामारी काही प्रमाणात नियंत्रणातही आलेली आपल्याला दिसून येते. जगातील विकसित देशांची कोसळणारी अर्थव्यवस्था, भारतासारख्या विकसनशील देशाच्या अर्थव्यवस्थेवर आलेला रिक्तभार आणि याच्या बरोबरीने अविकसित देशांमध्ये हळूहळू शिरकाव करणारा कोरोना व्हायरस ही सध्याची परिस्थिती आहे. अशा परिस्थितीत संपूर्ण जगाचे लक्ष भारताकडे लागलेले दिसून येते. याचे कारण म्हणजे भारताने कोरोना विषाणूवर मात करण्यासाठी केलेल्या प्रयत्नांची नोंद जागतिक आरोग्य संघटनेने घेणे आणि युरोपीय विकसनशील देशांनी भारताचे मार्गदर्शन घ्यावे अशा स्वरूपाची सूचना पुढे येणे आहे. विविध विकसित देशातील राष्ट्रप्रमुखांनी भारताकडे औषधांची मागणी करणे यातूनच भारताचे जगातील महत्त्व स्पष्ट होते. आंतरराष्ट्रीय नाणेनिधीने करोना काळातील व्यक्त केलेला आर्थिक नुकसानीचा प्राथमिक स्वरूपातील अंदाज ९ लाख कोटी डॉलर्स म्हणजेच भारताच्या राष्ट्रीय उत्पादनाच्या ३ पट इतका असून या आर्थिक नुकसानीबरोबरच रोजगारात मोठ्या प्रमाणात होणारी घट व त्यामुळे दारिद्र्यात होणारी वाढ संयुक्त राष्ट्र संघटनेच्या अहवालात नमूद केली असून केवळ भारतातच ४० कोटी लोक दारिद्र्यरेषेखाली ढकलले जातील असे म्हटले आहे. भारताचे विकास दर ३ टक्क्यांपर्यंत पोहोचला असला तरी भारत जी-२० गटात वरच्या स्थानावर असणार आहे अशी चिन्हे दिसत आहेत. कोरोनामुळे आंतरराष्ट्रीय व्यापारातील घट जवळ-जवळ ३५ टक्क्यांच्या खाली असून देशाची आयात ३० टक्क्यांपर्यंत खाली उतरली तर निर्यात ३२ टक्क्यांच्या वर पोहोचली आहे. भारतीय अर्थव्यवस्थेतील आशेचा एक किरण म्हणजे कृषी किंवा शेती व्यवसायातील बळीराजाच्या कृपेने अन्नधान्याच्या उत्पादनाच्या संदर्भात आपण काही प्रमाणात या रोगराईच्या काळातही सुरक्षित असलेले दिसून येतो. देशातील कोरोना संसर्गाच्या काळात अर्थव्यवस्थेतील विकासदर कमी न होऊ देण्याचे काम कृषी क्षेत्राने करून रोजगार पुरवठा ही मोठ्या प्रमाणात केलेला दिसून येतो. केवळ भारतातील जनतेसाठी नव्हे तर अखिल मानवजातीच्या उदरभरणाकरिता भारतीय शेतकरी या महामारीच्या काळात शेतात राबलेला आपण पाहिला आहे. आंतरराष्ट्रीय पातळीवर आपली परकीय गंगाजळी जवळ-जवळ पावणे पाच हजार कोटी डॉलर्सची असून ती वर्षभराच्या तेल आयातीसाठी पुरेशी आहे. या काळात भारतीय मध्यवर्ती बँकेने अर्थव्यवस्थेतील नवीन चार धोरणे स्पष्ट केली आहे.

१) पुरेशा प्रमाणात रोखता वाढविणे.

२) बँकांसहित सर्व वित्त संस्थांना वित्त पुरवठ्यास प्रोत्साहित करणे.

३) राज्य सरकारांच्या बाबतीत वित्तीय ताण कमी करणे.

४) पुरेशा सक्षमतेने कार्य करण्यासाठी बाजार व्यवस्थेला चालना देणे.

रिझर्व्ह बँकेचा भर पुनर्वित्त पुरवठ्यावर असून त्या अंतर्गत नाबार्ड, गृह वित्त बँक आणि सिडको यांना ३ लाख कोटींचा वित्तपुरवठा केला जाणार असून शेती आणि ग्रामीण उद्योगांकरिता २५ हजार कोटी, मध्यम व लघु उद्योगांकरिता १५ हजार कोटी व गृह बांधणीकरिता १० हजार कोटींचा वित्तपुरवठा केला जाणार आहे. सूक्ष्म व लघु वित्तपुरवठा करणाऱ्या संस्थांना याचा लाभ मिळावा याची विशेष काळजी रिझर्व्ह बँकेने कोरोना संसर्ग काळात घेतलेली दिसून येते. रोजगार केंद्रित अर्थचक्र फिरते राहण्याकरीता सूक्ष्म वित्तपुरवठा संस्था आणि गृहनिर्माण क्षेत्र महत्त्वाची मानली जातात. सुमारे १ लाख कोटींचा निधी बँकांना उपलब्ध होणार असून त्याचा वापर वरील क्षेत्रांसाठी होणार आहे. परंतु जोपर्यंत वरील वित्तपुरवठा गरजूंच्या हाती पडत नाही तोपर्यंत त्याचा उपयोग होणार नाही ही वास्तविकता विसरून चालणार नाही.

सध्या जगातील एकूण कर्जापैकी ४०% कर्ज हे चीन या एका देशाने इतर देशांना दिलेले दिसून येते. एवढेच नव्हे तर भारतातील खाजगी व्यापारी बँकांचे प्रचंड भाग भांडवल खरेदी करण्याचा सपाटाही चीनने लावला आहे. जपान, दक्षिण कोरिया देशांनी आपले उद्योगधंदे चीनकडून भारताकडे वळवण्यास सुरूवात केली आहे. त्यामुळे जरी जागतिक मंदी आली तरी ज्ञानी लोकांना जगभरात मागणी वाढणार असून भारतीय अर्थव्यवस्थेतून त्याची पूर्तता होऊ शकते. अर्थातच सेवा क्षेत्रास महत्त्वाचे स्थान असेल असे वाटते. परंतु जागतिक स्तरावर होणाऱ्या उलाढालीचा लाभ घेण्यास भारतातील युवक तयार आहेत का? याचा विचार आपण सर्वप्रथम करणे आवश्यक आहे. वास्तविक पाहता, लॉकडाऊन उठवल्यानंतरच्या आव्हानांचा सामना करण्यासाठी आपण आतापासून मानसिक तयारी करणे गरजेचे आहे. गावाकडून शहराकडे स्थलांतरित झालेले युवक कुटुंबासहित शहरात रुळलेले आहेत. त्यांच्या बायका-मुलांना शहरी व्यवस्थेची सवय लागलेली आहे. १०-१५ वर्षांपूर्वी गाव सोडताना ज्या सोयी सुविधा गावात उपलब्ध नव्हत्या त्या आता गावात उपलब्ध होताना दिसून येत आहेत. ग्रामीण भागात मोटारसायकल, मोबाईल, केबल टीव्ही, पाणी पुरवठा, रस्ते, घरांचे बांधकाम, शाळा, महाविद्यालये, बाजारपेठा, दवाखाने, छोटे-मोठे कारखाने, यांची तुलनात्मक वाढ दिसून येते. परंतु हे सर्व सुख उपभोगण्यासाठी या युवकांकडे रोख पैसे असणे गरजेचे आहे आणि ही गरज छोट्या-मोठ्या उद्योगधंद्यांमुळेच पूर्ण होऊ शकते. शहरातून गावात आलेल्या युवकांची व त्यांच्या कुटुंबांची मानसिक कुचंबणा होण्याची शक्यता दिसून येते. कारण या आधी हिवाळी-उन्हाळी सुट्टीमध्ये गावी एकत्र कुटुंबात जसे स्वागत होत होते तसे आता होताना दिसत नाही. गावातील जवळपास सर्वच कुटुंबातील उपभोग पातळी वाढली असून त्याची पूर्तता करणारी जमीन-शेती व शेती संबंधित व्यवसायाचा अपेक्षित विस्तार व विकास झाला नाही. परिणामी रोख पैशांचा ओघ थांबला. यातून मार्ग काढायचा असेल तर शहरातून गावात आलेल्या तरुणांना संगणकीय ज्ञानकौशल्य आणि शहरातील वेळ व्यवस्थापनाची सवय याच्या आधारे स्थानिक उपलब्ध साधनांचा उपयोग करून शेतमाल प्रक्रियेशी किंवा दुग्ध व्यवसायाशी निगडीत स्वतःचा एखादा व्यवसाय सुरू करता येईल. जगात आणि भारतात प्रक्रिया केलेल्या रानभाज्या, पालेभाज्या, कडधान्ये यांना प्रचंड मागणी आहे. शेती संबंधित उद्योग कोणत्याही प्रकारची भांडवली गुंतवणूक न करता, घरातील सर्वांना बरोबर घेऊन करता येतील. कोरोना संसर्गामुळे आलेल्या या संकटावर मात करण्याची हीच योग्य वेळ आहे. सध्या आपल्या भागातील युवकांकडे खेळते भांडवलाचे प्रमाण जरी कमी असले तरी प्रचंड मनुष्य बळ आहे. या मनुष्य बळाचा आर्थिक विकासात उपयोग करून घेणे गरजेचे आहे. त्याकरिता विविध शासकीय योजना, बँका यांचीही जोड मिळू शकते. कारण कोरोनामुळे पैसा हा महत्त्वाचा नसून माणुसकी महत्त्वाची असते ही भावना वाढीस लागलेली दिसून येते. गावात आणि शहरात युवक मंडळी, लोकप्रतिनिधी, व्यावसायिक, उद्योजक, गृहनिर्माण संस्था, अन्न वाटपाकरिता पुढे सरसावल्या आहेत. हजारो-लाखोंच्या संख्येने जेवणाच्या पाकिटांचे आणि रेशनिंग पाकिटांचे मोफत वितरण केलेले आपण पाहिले आहे. यामुळेच एक आशा वाटते की कोरोनामुळे निर्माण झालेली आर्थिक समस्या दूर करता येऊ शकते. शहरातून खेड्यात स्थलांतरित झालेले हे कुशल मनुष्य बळच आपल्या गावांची संपत्ती असेल. काही काळापुरती मागे गेलेली गावांची अर्थव्यवस्था काही महिन्यांमध्ये सुरळीत

नव्हे तर प्रगतीपथावर जाऊ शकते. तसेच शहरांची अर्थव्यवस्था सुद्धा काही प्रमाणात बदलू शकते. करोना संसर्गाच्या बिकट काळात लोक बेरोजगार झाले. उत्पन्नाचे साधन संपुष्टात आले. मजुरांचे पगार कमी झाले. मजुराला काम मिळेनासे झाले. परंतु जर बेरोजगार व बेदखल झालेल्या तळातील कामगार वर्ग, प्रत्यक्ष अत्यल्प उत्पन्न असणारा शेतकरी या घटकांकरिता वेगाने उपाययोजना आखणे गरजेचे आहे. महिला बचत गट यांच्या माध्यमातून तळातील कुटुंबांपर्यंत रोजगार पोहचू शकतो व महिलांना मिळालेला रोख पैसा किंवा उत्पन्न हा त्या कुटुंबाच्या उदरनिर्वाहाकरिता उपयोगात आणता येतो. थोडक्यात स्पष्ट करावयाचे तर गेल्या पाच-सहा वर्षातील शासकीय धोरणांमुळे अनेक बँकांमध्ये शेतकरी, शेतमजूर, लहान व्यावसायिक यांची बचत खाती उघडण्यात आली आहेत. या खात्यांना आधार क्रमांक, पॅन क्रमांक जोडल्यामुळे लाभार्थ्यांना ऑनलाईन व्यवहार करता येतात. कृषिदूतासारखे बँकदूत शेतकऱ्यांच्या सोयीनुसार त्यांच्या शेतावर आणि घरापर्यंत पैशाचे व्यवहार करीत आहेत. याचा फायदा आता गावात स्थलांतरित झालेल्या युवकांना होऊ शकतो. तर उलटपक्षी शहरातून गावात आलेल्या युवकांचा शहरातील इतर व्यक्ती व संस्थांशी असलेला संबंध उपयोगात आणून शेतीमाल, प्रक्रिया केलेल्या वस्तू शहरातच नव्हे तर राज्यभर, देशभर, परदेशात पाठविता येणे शक्य होऊ शकते. ग्रामीण भागात नव्याने स्थलांतरित झालेल्या या शहरी युवकांना जागतिक बाजारपेठेची जाण आलेली असते. त्यामुळे इंटरनेटच्या माध्यमातून जागतिक बाजारपेठ त्यांच्या गावापर्यंत येऊ शकते. फक्त या लोकांनी त्याचा लाभ करून घेणे गरजेचे आहे. स्वाभाविकच, कोरोनाच्या निमित्ताने आलेल्या संकटाचे संधीत रूपांतर करता येऊ शकते. केवळ इच्छा शक्तीची गरज आहे.

■■■

## पाणी अडवा, पाणी जिरवा

तहानलेल्या चराचराची
शमवू या तहान ।
पाणी अडवा, पाणी जिरवा
मंत्र हाच महान ।।धृ.।।

काटकसरीला आचरू या
जपून पाण्यास वापरू या
उन्हाळलेल्या तप्त भुईला
द्या ओले वरदान ।।१।।

गळक्या तोट्या बदलून टाका
फुटक्या टाक्या उचलून फेका
नवीन येवो गावोगावी
भूजल तंत्रज्ञान ।।२।।

शेततळ्याची किमया घडवू
थेंब थेंब पाण्याला अडवू
सुजलां-सुफलां भारत होवो
सुरू हे जल अभियान ।।३।।

**डॉ. श्रीनिवास आठल्ये**
ग्रंथपाल

# कोविड - १९ महामारी आणि पक्षीय राजकारण

**प्रा.डॉ.सूर्यकांत लक्ष्मणराव शेळके**
(राज्यशास्त्र विभाग)

नैसर्गिक संकट आणि मानवनिर्मित संकट हा सृष्टी आणि समष्टीचा (सजीव सृष्टी तथा मानवी जीवन) अविभाज्य भाग आहे. त्याचा सामना करतच मानवी जीवनाचा उत्क्रांत संक्रमण काळ अविरत चालू आहे. त्यात चढउतार होतीलही पण ही प्रक्रिया अखंड चालू असणार आहे. तो निसर्गचक्राचा भागच आहे. परंतु मानव या बुद्धिमान प्राण्याने आपल्या प्रयत्नाने नेहमीच येणाऱ्या संकटांना तोंड देत आणि त्यावर मात करत आपला जीवन प्रवास कायम अखंडित ठेवला आहे. त्यामुळे मानवासाठी नैसर्गिक संकट किंवा मानवनिर्मित संकट नवे नाही. तथापि कोविड-१९ या महामारीच्या संकटाने मात्र 'न भूतो न भविष्यति' अशी अभूतपूर्व परिस्थिती निर्माण करून सबंध जगालाच जेरीस आणले आहे. कोविड-१९ या महामारीच्या संकटामुळे माणूस कधी नव्हे इतका भयभीत झाला आहे आणि हतबलही झाला आहे. संपूर्ण जगाचे चलनवलन ठप्प झाले आहे. अर्थातच कोविड-१९ या महामारीच्या विळख्याने अर्थकारणावरचे अरिष्ट अधिकच गडद केले आहे. त्यामुळे बेरोजगारी, नोकरकपात, गरिबी, दारिद्र्य, भूकबळी, उपासमार, स्थलांतर, शिक्षण, आरोग्य, दळणवळण इ. समस्या गंभीर बनल्या आहेत. पर्यायाने जगातील शासन यंत्रणा अस्वस्थ आणि बेजार आहेत. मुळात कोविड-१९ वर मात करण्याइतपत प्रभावी औषधोपचार नाही आणि आहे त्या औषधांचा तुटवडा तरी आहे किंवा औषधांच्या किमती सामान्य माणसाच्या आवाक्याबाहेर तरी आहेत. अर्थातच त्या परवडणाऱ्या नाहीत. जमेल त्या पद्धतीने आणि आहे त्या साधनसामग्रीच्या साह्याने मेडिकल सायन्सचे संशोधक आणि आरोग्य यंत्रणा उसने अवसान घेऊन काम करण्याचा प्रयत्न करत आहेत. उपाययोजनांचे सर्व मार्ग तोकडे पडताहेत. जनतेच्या मागण्या व समस्यांची पूर्तता करण्यासाठी शासन यंत्रणेकडे उत्तर नाही. अशावेळी यावरचा उपाय म्हणून जगभरातील शासनयंत्रणा, आरोग्य संघटना आणि अर्थ-राजकीय संघटना अगदी देशपातळीपासून तर आतंरराष्ट्रीय पातळीपर्यंत परस्परांवर आरोप-प्रत्यारोप करण्याची संधी शोधत आहेत. त्याला भारतातील केंद्र सरकार आणि राज्य सरकारही अपवाद नाहीत. एक देश दुसऱ्या देशाकडे संशयाने पाहतो आहे. एक माणूस दुसऱ्या माणसाकडे संशयाने पाहतो आहे. आणि देशांतर्गत सत्ताधारी पक्ष आणि विरोधी पक्ष तर संकटाकडे संधी म्हणूनच पाहतो आहे. जमेल त्या पद्धतीने परस्परावर आरोप-प्रत्यारोप तथा दोषारोप करण्याची संधी शोधत आहेत. जनतेमध्ये संभ्रम आहे. मीडियाने विश्वासार्हता गमावली आहे. अशाप्रकारे जगातील मानवी समाजजीवनावर नव्हे तेवढी वाईट परिस्थिती या कोविड-१९ च्या महामारीने आणली आहे. ही आजच्या जगाची वस्तुस्थिती आहे.

भारत हे जगातील सर्वात मोठे लोकशाही राष्ट्र म्हणून ओळखले जाते. तथापि संवैधानिक लोकशाही व्यवस्थेने आखून दिलेल्या चौकटीत राहून राज्यकारभार पाहणे हे शासन यंत्रणा अर्थात सत्ताधारी पक्ष आणि विरोधी पक्ष यांचे कर्तव्य आणि जबाबदारी आहे. आणि तेच लोकशाहीमध्ये अभिप्रेत आहे. भारतीय संवैधानिक लोकशाही व्यवस्था ही कल्याणकारी राष्ट्र राज्य निर्माणाची गुरुकिल्ली आहे. लोकशाही व्यवस्थेतील शासन हे मायबाप सरकार (Benevolent Government) मानले जाते. त्यामुळे जनतेच्या हिताची व कल्याणाची काळजी वाहणे ही राज्याची पर्यायाने सरकारची जबाबदारी आहे. संकट नैसर्गिक असो की मानवनिर्मित असो ते अपरिहार्य असले; तरी सहजीवन हा माणसाचा स्थायीभाव आहे. आणि म्हणून संकट समयी शासन-प्रशासन, समाज, राजकीय पक्ष संघटना, सेवाभावी संस्था अशा सर्वांनी एकवटून संघटितपणे एकदिलाने

संकटाचा सामना करणे ही केवळ आवश्यकता नसून, अपरिहार्यता आहे. राजकारण म्हटले कि, सत्ता-संघर्ष आलाच तेही वावगे मानण्याचे कारण नाही. परंतु असे असले, तरी धोरणात्मक राजकारण हा या सत्ता संघर्षाचा केंद्रबिंदू असणे हे निरोगी लोकशाही आणि कल्याणकारी राज्याच्या दृष्टीने हिताचे असते आणि आहे. आणि खरे म्हणजे तेच अस्सल संवैधानिक लोकशाही व्यवस्थेचे मर्म आहे. आणि म्हणून निदान कोविड - १९ च्या महामारीच्या संकट काळात तरी धोरणात्मक राजकारणाची अपरिहार्यता शिरोधार्य मानून भारतातील सत्ताधारी पक्ष आणि विरोधी पक्ष काम करणे आवश्यक आणि अभिप्रेत होते आणि आहे. तथापि कोविड-१९ च्या काळातही सत्तालोलुप राजकीय पक्ष संघटनांनी त्याचे राजकीय भांडवल करण्याची एकही संधी सोडल्याचे दिसत नाही. जेव्हा सत्तासंघर्षच राजकारणचा स्थायीभाव बनतो; तेव्हा राजकारणी मंडळी संकटाकडे संधी म्हणूनच पाहतात. आणि मग जेव्हा सत्ताप्राप्ती किंवा सत्तास्वार्थ हेच राजकारणाचे अंतिम लक्ष्य व सत्य बनते; 'संकटात संधी शोधणे' हेच राजकारणाचे समीकरण बनते. आणि हेच भारतात कोविड-१९ च्या महामारीच्या काळात दिसून आले आहे; हे कटू असले तरी सत्य आहे; हे नाकारता येणार नाही. प्रकरण डोनाल्ड ट्रम्पच्या भारत भेटीचे असो कि तबलिगी जमातीच्या कार्यक्रमाचे असो; कामगार, मजुरांच्या घरवापसीचे असो की अनिवासी भारतीयांचे विमानाने भारतात येणे असो; कोविड - १९ च्या उपचारासाठी छावण्या उभारणे असो की धारावी झोपडपट्टी एरियातील संसर्ग वाढ असो; मुख्यमंत्री उद्धव ठाकरेंचे घराबाहेर न पडणे असो की मंत्र्यांना कोरोनाची लागण होणे असो; लोकांचे घराबाहेर पडणे असो की लोकांना पोलिसांनी केलेली मारहाण असो; लोकांना नियमाचे जाचक बंधन असो कि श्रीमंतांचे सोहळे असो; राजकीय पक्षाचे कार्यक्रम, मंत्र्यांचे दौरे असो की काही राज्यातील निवडणुकांच्या प्रचार सभा असो; कोविड लसीची निर्मिती असो की कोविड लस घेणे असो; शाळा महाविद्यालये सुरू करणे असो की परीक्षा घेणे किंवा न घेणे असो; लॉकडाऊन वाढविणे असो की लॉकडाऊन ओपन करणे असो; दारूची दुकाने उघडणे असो की मंदिराचे द्वार उघडणे असो; रेल्वे सुरू करणे असो की लोकल सेवा बंद ठेवणे असो; या सर्व प्रकरणाकडे धोरणात्मक राजकारणाच्या दृष्टिकोनातून पाहणे आणि उपाययोजना सुचविणे आवश्यक होते परंतु सर्वच राजकीय पक्षाकडून त्याचे राजकीय भांडवल करण्यात आले. त्याला सातत्याने राजकीय आणि पक्षीय रंग देण्याचा प्रयत्न करण्यात आला. आणि भरीस भर म्हणजे मीडियाने याचे केलेले चर्वितचर्वण होय. याचा अर्थ या टीकाटिप्पणीत आणि दोषारोपात मुळीच किंवा अजिबात तथ्य नाही असे नाही. निश्चितच ह्या दोषारोपात आणि टीकाटिप्पणीत तथ्य आहेच. परंतु असे जरी असले तरी त्याचा बाज हा मात्र विरोधासाठी विरोध, क्रिया- प्रतिक्रिया, शह - काटशह असाच राहिला आहे. त्यामुळे त्याचा हेतू शुद्ध नाही. सत्ताधारी पक्षाने विरोधकांना हलक्यात घ्यायचे किंवा दुर्लक्ष करायचे आणि विरोधी पक्षाने सत्ताधारी पक्ष किंवा सरकार अडचणीत असे येईल यासाठी कुरघोडी करायची आणि त्याला कोंडीत पकडायचे; असा हा राजकारणाचा एकूण सारीपाट होता आणि आहे. त्यामुळे या सत्ताकेंद्री राजकाराणाच्या साठमारीत ह्या टीकाटिप्पणीला जो धोरणात्मक मूल्य आणि जनतेच्या कल्याणाचा हेतू असायला हवा होता तो कुठेच दिसून येत नाही. तथापि लोकशाहीमध्ये केवळ राजकारणी लोकांना जबाबदार धरून चालणार नाही. कारण लोकशाहीचे सूत्र हे 'यथा प्रजा तथा राजा' असे असते. परंतु अलीकडच्या काळात जनता नावाची गोष्टच लोप पावली आणि अंधभक्त उदंड झाले आहेत. आणि ह्या अंधभक्तांची मांदियाळी सर्वच राजकीय पक्षांकडे आहे. आपल्या पक्षाची भूमिका योग्य असो किंवा अयोग्य असो; चूक असो किंवा बरोबर असो; त्याचा निराधार युक्तिवाद करून आक्रमकपणे त्या भूमिकेचे समर्थन करायचे. हा जणू आजच्या राजकारणाचा शिरस्ताच पडला आहे. दुसरी महत्त्वाची बाब म्हणजे बुद्धिमान समजला जाणारा मध्यम वर्ग आपण त्या गावचेच नाही या अविर्भावात एक तर 'बघ्याची भूमिका' घेतो आहे किंवा 'चलता है' ही भूमिका घेतो आहे. आणि समजा एखाद्याने चुकून बोलण्याचा प्रयत्न केलाच तर त्याच्या पोटापाण्याचा प्रश्न निर्माण केला जातो. म्हणून तोही सहन करत गप्प आहे. आणि विशेष म्हणजे या सत्ताकेंद्री राजकारणात जागरण गोंधळ घालणार, भूमिका नसलेला कणाहीन तथाकथित लोकशाहीचा चौथा खांब असलेला मीडिया म्हणजे गोंधळ आणि अराजकाच्या व्याकरणाचे

जनकत्वच स्वीकारला आहे. आणि म्हणून मूल्यहीन सत्ताकेंद्री बिघडलेल्या लोकशाही राजकारणाचे धुरीणत्व पक्षीय अंधभक्त, बुद्धिमान बुद्धिभेदी बघे, आणि दिशा चुकलेला व भूमिका गमावलेला मीडिया यांच्याकडेच जाते. त्यामुळे या बिघडलेल्या व्यवस्थेला राजकारणी जेवढे जबाबदार आहेत. तेवढेच किंबहुना त्यापेक्षा अधिक हे धुरीण गट कारणीभूत आहेत. आणि म्हणूनच तेच या बिघडलेल्या व्यवस्थेचे वाहक आहेत. हेही विसरून किंवा दुर्लक्षित करून चालणार नाही.

खरं म्हणजे याठिकाणी कोण बरोबर आणि कोण चूक हे ठरविण्याची ही वेळही नव्हे आणि जागाही नव्हे. परंतु या पक्षीय राजकारणाच्या साठमारीत बळी ठरला तो सामान्य माणूस. प्रश्न आहे तो सामान्य माणसाच्या हेळसांडीचा, त्यांच्या जगण्या-मरण्याचा, त्यांच्या वेदनांचा-अवहेलनांचा, विनाउपचाराने मेलेल्या रुग्णांचा, बेरोजगारीची कुऱ्हाड कोसळलेल्या कामगार, मजूर, नोकरांचा, विद्यार्थ्यांच्या गैरसोयीचा व बरबादीचा आणि जगणं हरवलेल्या माणसांचा. तथापि 'सर्वच घोडे बारा टक्के' किंवा 'सर्वच एका माळेचे मणी' असे झाले की कोणत्याही एकट्या दुकट्या व्यक्तीला किंवा राजकीय पक्षांना जबाबदार धरून चालत नाही; तर प्रश्न व्यवस्थात्मक आहे. आणि म्हणून त्याचे उत्तरही धोरणात्मक राजकारणाच्या माध्यमातून व्यवस्था परिवर्तन हेच असू शकते. आणि म्हणून कोरोना महामारीकडे शासन-प्रशासन, राजकीय पक्ष संघटना, स्वयंसेवी संस्था आणि समाज या सर्वांनी संकट म्हणून तर अनुभव घेतलाच आहे परंतु खरा प्रश्न आहे तो काही तरी शिकण्याचा धडा घेण्याचा आणि एक राष्ट्र म्हणून, समाज म्हणून मानवतेच्या दृष्टिकोनातून झालेल्या आणि होणाऱ्या चुका टाळण्याचा आणि पुन्हा नव्याने उभा राहण्याचा. राजकीय स्वार्थाने संकटाकडे संधी म्हणून सकारात्मक दृष्टिकोनातूनही पाहता येऊ शकते; हे शाश्वत सत्य उमगण्याचा. असे झाले तर आणि तरच संकटावर मात करू शकू आणि समग्र मानवतेचं जतन करू शकू.

■■■

## स्वभाव

औषध न लगे स्वभावा
अस्थिर, चंचल, भित्रा, कपटी, स्वार्थी
असे नानाविध रंग दिसतात स्वभावाचे
काही स्वभावास ना रुचे कोणाचीही मऊ भाषा
आपल्या करारी भाषेसच ते मानी निरंतर
आपलेच बोलणे प्रमाण ते दाखवी खरेतर
स्वभाव बदलून पाहा ही भाषा त्यांच्या पचनी ना पडे
विचार जे मनी तेच अंगी बाणे हे त्यांच्या अंतरी ना उतरे
अशा या स्वभावास कोणती मात्रा पाजावी?
अशा या स्वभावास कोणती दिशा द्यावी ?
सर्वतोपरी प्रयत्नांची पराकाष्ठा करुनही
औषध न लगे स्वभावा हेच सत्य दिगंतर
हेच सत्य दिगंतर

**डॉ. माधुरी रामधरणे**
मराठी विभाग

# COVID-19 Pandemic and Retail Sector in India

**Dr. Soni P.K.**
Assistant Professor in Commerce

## INTRODUCTION

Indian retail sector has been identified as the fifth largest sector around the world and it is trying to contribute 10-12% of the GDP of Indian economy. When compared with other retail economies of the world, Indian retailing is acting as nerves for its economy as it creates livelihood for about more than 50 million people. Large population of the country is an added advantage for the growth of the retail sector in India. The retail density of India is 11 i.e., 11 outlets for per 1000 people. About 58% of the retail sector contribution to annual GDP is done by private (individual) consumption. Of this, 48% consumption is done in merchandise retail like grocery, FMCG, Home improvements, Jewellery, etc., and 52% in service retail like education, wellness, medical, etc., This 48% merchandise retail comes about Rs. 59 lakh crores of which 70% (40.95 lakh crore) sales is done by essential items and remaining 30% is non-essential items such as fashion, apparels, jewellery, food service, etc., The essential items sales is expected to grow by nearly 10% by the end of the FY 21and it may come up to Rs. 44.8 lakh crore. This shows the intertwined relationship between the Indian retail growth and the consumption pattern of the Indians. As per KPMG analysis, Indian retail report of 2018, the growth of this sector will be 12-13% worth of 948 billion USD at the end of FY2019.

